# ॥ श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ ॥



श्रीमध्वार्य मुनींद्र संतति महारूपावतारा धिपो । वेदांतामृत पूर्ण वाक्य किरणः श्रीविठ्ठलाधारकः ॥
श्रीगोकर्ण वराश्रमो विजयते तत्पादपद्मद्वये । पूर्णप्रज्ञयतीश्वरो गुरुतमो नित्यंप्रणामोऽस्तुमे ॥

|| श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ ||

# ।। श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ ।।

संकलन

चंद्रकांत शांताराम केणी

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी

# SHREE POORNAPRADNYA TEERTH
(A Biographical Sketch)

प्रथमावृत्ति
ज्येष्ठ शु. २ शके १९२६
२१ मे २००४

संकलन
चंद्रकांत शांताराम केणी

प्रकाशक
श्रीनिवास वासुदेव शेणवी धेंपे
अध्यक्ष, श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ,
पर्तगाळ, काणकोण-गोवा ४०३ ७०२

अक्षरजुळणी
कुळागर प्रकाशन, मडगांव

मुद्रण
इंम्प्रेशन्स, वेळगांव

## दीन दयाकर - श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थ

आनंद तीर्थार्य पदाब्ज भक्तः। स्वानंदमग्नो विषयेष्वसक्तः ॥
ज्ञानं ददद्योग्य जनेषु पूर्ण - प्रज्ञाभिधः श्री यतिराट्विभाति ॥१॥

स्वछाञ संस्थापित शंखचक्रः । संत्छास्त्र संतोषित लोकचक्रः ॥
स्वच्छेंदुवक्रः प्रतिभाति पूर्ण-प्रज्ञाह्वयो भूमितले यतीन्द्रः ॥२॥

अव्दैतवादप्रशमैकनिष्ठः । सव्दैष्णवानां प्रियकृव्दरिष्ठः ॥
सव्दैभवः साधुसभासुपूर्ण - प्रज्ञाख्ययोगी भुवने विभाति ॥३॥

वेदान्त शास्त्रार्थ विचार दक्षः । मोदप्रदो वारित दुष्ट पक्षः ॥
देदीप्यतेऽसौ भुवनेषु पूर्ण - प्रज्ञाभिघः श्री यतिराजवर्यः ॥४॥

विख्यात राजोचित चिह्न जालैः। सितातपत्रोत्तम शंख तालैः ॥
जितारिवेगे भुवनेषु पूर्ण - प्रज्ञाभिधः श्रीयतिराट् विभाति ॥५॥

श्रीविट्ठल ध्यान विधूतमोहो। देवेशमध्वार्चन पूत देहः ॥
जीवोत्तमार्याभिजनोत्थपूर्ण - प्रज्ञाख्ययोगी भुवने विभाति ॥६॥

गोकर्ण संस्थान वराधिराजः । लोकार्चितो सार्व निवार्य तेजः ॥
शोकापहः साधु सभासु पूर्ण - प्रज्ञाभिधोभाति यतीन्द्रवर्य :॥७॥


# श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

**जन्मतिथि** : शके १७३१, भाद्रपद शुक्ल चतुर्थी, रविवार

**जन्मस्थळ** : मुडगेरी (शिवेश्वर) कारवार जवळ,
रात्रौ घटि ७॥

**जन्मनाम** : गणेश

**जन्मकुंडली**




स्वाती चरण ४ राहु महादशा

**संन्यासाश्रम** : तारण नाम संवत्सर १७४६ (1824 A.D.)
चैत्र पुर्णिमा श्रीमठ पर्तगाळ

**आश्रमनामः** श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ

**श्रीगुरुपीठारोहणः** सर्वधारि संवत्सर १७५० (1828 A.D.) श्रावण कृष्णपक्ष

**शिष्याश्रम** : विकारी संवत्सर १७६१ (1839 A.D.)
माघ शुक्ल पंचमी शुक्रवार

**आश्रमनामः** श्रीपद्मनाभतीर्थ - श्रीक्षेत्र गोकर्णमठांत दीक्षा.

**वृन्दावनकालः** प्रमाथी १८०१ (1879 A.D.) ज्येष्ठ शुक्ल व्दितीया शनिवार
प्रातःकाल ६ घटिका मोक्षारूढ. (पर्तगाळमठीं)

# उपोद्घात

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ हा सारस्वत अस्मितेचा व एकात्मतेचा प्राणरक्षक मानदंड आहे. इतिहासाने विघटीत केलेल्या व नियतीने अनेक दिव्यें पार करण्याची सजा फर्मावलेल्या ह्या समाजाच्या संधारणाचे व संघटनेचे कार्य तब्बल सपादपांच शतके पार पाडून समाजाला अधिक ऊर्ज्वस्वल बनविण्यासाठी अविरत कार्यरत राहिलेल्या ह्या मठाच्या यशोगाथेंत सारस्वत समाजाचा इतिहास सामावलेला आहे. या दीर्घ कालावधीत श्री मठाला अखंडित २३ स्वामीजींची परंपरा लाभली. बदरिकाश्रमांत संन्यास दीक्षा घेऊन वारणासी क्षेत्रांत ईशान्यप्लवा गंगेच्या तिरावर श्रीनारायण तीर्थांनी ह्या मठाचें जे लहानसें रोपटे रोवलें त्याची या परंपरेने निगा राखून अभिवृध्दीची काळजी घेतली म्हणूनच आज विशाल वटवृक्षाप्रमाणे त्याची पाळेमुळे फांद्या विस्तारून सुदृढ होऊ शकली. स्थापनेचा दिवस चैत्र शुक्ल व्दितीया शके १३९७ (1475 A.D.) हा होता.

एखाद्या वृक्षाप्रमाणें संस्था व समाजाचा इतिहास स्वतंत्र कालखंड पाडून त्याचा अलगपणे विचार करणे अप्रस्तुत नव्हे, तर संदर्भहीन व व्यवहार शून्यही ठरेल. वर्तमानाचे बीज भूतकाळांत खोल रुजलेले असते. किंबहुना वर्तमानकाळाची दिशा भूतकाळात ठरलेली असते. वर्तमानकाळांतील प्रयत्नाचे फळ भविष्यकाळात मिळूं लागते. मंदिराचा विचार करा. त्याची जडणघडण, बळकटी, स्वरूप काय असावे त्याचा भूगर्भातील पाया ठरवित असतो. तो नजरेंत भरत नाही. वास्तूची सुबकता, सौंदर्य, तिचे शिल्प आदि गोष्टी पाहून आपले मन प्रसन्न होत असते. तेथून आपली नजर जाते कलशावर. केवळ कलशाचा विचार करणे चुकीचे असून आधी पायाचा विचार केला पाहिजे ही पूर्वजाची रीत राहिलेली आहे. त्या दृष्टीने श्री मठाच्या परंपरेतही एखाद्या स्वामीजीच्या जीवनकार्याचे मूल्यमापन करावयाचे झाल्यास त्यांच्या गुरुंचे सर्वप्रथम स्मरण करणे अप्रस्तुत ठरणार नाही. किंबहुना मठाच्या परंपरेंत मठाधीश आपला परिचय देताना तर परमगुरु व गुरुवर्याचे न चुकतां स्मरण करतात. आज आपण जे आहोंत ते विशिष्ट परंपरेंत, उदात्त संस्कारांत, अभिमानास्पद कारकिर्दीने गौरवान्वित वारशाचे उत्तराधिकारी आहोत हे त्याना नमूद करायचे असते.

परमपूज्य श्री पूर्णप्रज्ञतीर्थ हे श्रीमठ परंपरेतील अठरावे स्वामी होत. १९ व्या शतकाच्या तिसऱ्या दशकापासून सातव्या दशकाच्या अखेरपर्यत अर्धे शतक त्यानी

आपल्या कठोर साधनेने, अव्दितीय विव्दत्तेने, प्रासादिक वाणीने, समाज उध्दाराबद्दल अकृत्रिम कळवळ्याने, व्यापक तीर्थाटनाव्दारे आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा मठानुयायी वर्गाच्याच नव्हे इतरेजनाच्या मनावर केवळ खोलवर उमटविलाहि. अनासक्ती योगाचें त्यानी अखंड आचरण केले आणि श्री विठ्ठलाच्या साधनेंत ते कृतार्थ जीवन जगले. नियतीने त्यांची परीक्षा घेण्याचे अनेक कसोटीचे क्षण त्यांच्या आयुष्यात आणले; परंतु 'रामदेव त्याना क्षमा करो,आपला प्रमाद ते जाणत नाहीत'' अशा वृत्तीने त्यानी अविचारी लोकांकडे दुर्लक्ष केले. इतकेच नव्हे तर चुकलेली वाट सोडून त्यानी नीट मार्गावर यावे यासाठी प्रयत्नही केले. मठाधीशाच्या कर्तव्य पालनाची जबाबदारी नसती तर श्रीपूर्णप्रज्ञतीर्थानी शास्त्र ग्रंथ, विलोकनें व आध्यात्मिक साधना करीत जीवनकाल आनंदाने व्यतीत केला असता. कारण जो वारसा गुरुवर्य श्री आनंदतीर्थाकडून मिळाला त्याची उदात्तता फिकी पडू न देतां अधिक कौशल्याने पुढे चालविण्याची क्षमता आपल्यांत आहे याची श्रीपूर्णप्रज्ञतीर्थाना पूर्ण कल्पना होती. परंतु संन्याशी असले तरी मठाधिपती असल्याने आपल्या समवेत समाजाला नेण्यासाठी प्रसंगी सामाजिक प्रथा, रूढी, मानमान्यतांची दिशा वळविण्यासाठी वेळीच प्रयत्न केले नाही तर समाज सुकाणू नसलेल्या गलबता प्रमाणे भरकटत एखाद्या खडकावर ठोकर खाईल या विचार सूज्ञ मठधिशांना करावा लागतो. तेवढे भान श्रीपूर्णप्रज्ञतीर्थाना होते. समाजात त्या काळात नवी परिवर्तने घडू घातली होती. युरोपीय राजसत्तेच्या प्रभावाखाली आधुनिकतेच्या भ्रामक कल्पना समाजात रूढ होऊ लागल्या होत्या. कायद्याची कलमे पुढे करून राज्यकर्त्याच्या मदतीने आपले ईप्सित साध्य करू पहाणारा एक तथाकथित पुढारलेला वर्ग परंपरेशी फारकत घेण्यास व देवगुरूंच्या मर्यादाचे उल्लंघन करण्यास कचरत नव्हता. या पार्श्वभूमीचा अंदाज घेतल्याशिवाय श्री पूर्णप्रज्ञतीर्थाच्या कल्पकतेची व विव्दत्तेची, आत्मक्लेश सोसूनही समाजाला सोबत नेण्याची अधिकार वाणीने धर्मशास्त्र व अध्यात्म संस्कृती, समाजकरण, साधन शुचिता, पारमार्थिक आदि गोष्टींचा त्यानी जो पुरस्कार केला त्याचे मूळ गुरुवर्य श्रीआनंदतीर्थ यांच्याकडून मिळालेल्या संस्कारात जसे आहे तसेंच प्रिय शिष्य श्री पद्मनाभतीर्थ यांच्या कार्यसिध्दीमध्येहि पाहातां येईल. त्यादृष्टीने चरित्र नायकाच्या गुरु व शिष्याच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेणे अप्रस्तुत ठरूं नये.

# विरक्त व्यवहारी श्री आनंदतीर्थ

श्री आनंदतीर्थ हे मठाला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देणारे म्हणजे व्यवहारदृष्टि असलेले होते ते तर खरेच, परंतु ह्या व्यावहारिक पाशात स्वतः ते गुरफुटून गेले नाहीत. अत्यंत विरक्त अशी त्यांची ख्याती होती. संस्थानचा कारभार त्यांनी चालविला. व्यवहार सांभाळला, पण स्वतःची पारमार्थिक उन्नति करून घेण्यात ते उणे पडले नाहीत.

**आश्रम दीक्षाः** क्रोधन नाम् संवत्सर शके १७२७
चैत्र शुक्ल त्रयोदशी (1805 A.D.)

**श्री गुरुपीठारोहणः** वृष संवत्सर शके १७४३
माघ कृष्ण चतुर्दशी (1822 A.D.)

**वृंदावनः** सर्वधारी संवत्सर शके १७५०
श्रावण शुक्ल नवमी (1828 A.D.)

श्रीआनंदतीर्थ स्वामींनी जी लौकिक कार्ये केली, त्यांतले सर्वात मोठे कार्य म्हणजे पर्तगाळी मठाचा जीर्णोद्धार (1810 A.D.) करून मठाच्या पटांगणात त्यांनी मारुतीसाठी एक उंच घूड बांधला हे होय (1811 A.D.) त्याचप्रमाणे पैंगीण गावातील परशुराम देवालयाचा घूड उभारण्यास देवालयाच्या महाजन मंडळीस मदत केली. वेताळ देवालयात उत्सवाच्या वेळी एक कापडाचा 'टका' वाचण्यात येतो. तो टका शके १७४५ (1823 A.D.) वर्षी स्वामीजींनी तयार करून दिला.

श्रीआनंदतीर्थ शिष्यस्वामी असताना शके १७३१ मध्ये उत्तरेतून बडोद्यावरून गोकर्णला परत येत होते. त्यावेळी ६० ब्राह्मण, ३० शिपाई, २ उंटस्वार, सोळा घोडे स्वार दोन बैलस्वार व एक पालखी यांसह जाण्यास गायकवाड सरकारने परवाना दिला होता. गोकर्णचे आनंदतीर्थ स्वामी हे १०० माणसे, एक पालखी १० घोडे, १ हत्ती यांसहीत यात्रेला जात आहेत त्याना कोणी अवरोध करूं नये असा रहदारी हुकूम जिल्ह्याच्या मॅजिस्ट्रेटने दिला होता. असेच दोन हुकूम शके १७३९ साली व १७४१ वर्षी दिले होते अशी नोंद दप्तरी नमूद आहे.

श्री आनंद तीर्थ यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक तीर्थयात्रा केल्या. शके १७३३ (1811 A.D.) प्रजापती सवत्सरांत त्यांनी रामेश्वर क्षेत्राची यात्रा केलेली असून त्या

निमित्ताने अनंत शयन, तोताद्रि, कुंभकोण, श्रीरंग, विष्णुकांची वगैरे क्षेत्रांत जाऊन देवदर्शन घेतले.

ईश्वर संवत्सर शके १७३९ (1817 A.D.) हिमालयांतील बदरीनाथ क्षेत्राची यात्रा करण्याचा संकल्प करून उत्तर भारतांतील अधिकाधिक तीर्थक्षेत्राची यात्रा घडावी असा दृष्टिकोन ठेवला. त्यावर्षी चातुर्मास व्रताचरण श्री आनंद तीर्थानी वारणासी येथील स्वकीय मठांत केले. चातुर्मास व्रताची यथोचित सांगता झाल्यावर श्री स्वामीजींनी बदरीनाथकडे प्रस्थान केले. वाटेत उत्तरदेशीय तीर्थाचें संदर्शन केले..

बदरीनाथहून परतण्याच्या वाटेवर शके १७४० मध्ये पुन्हा वारणासी येथील स्वकीय मठी चातुर्मास व्रताचरण केले (1818 A.D.) तेथून परत गोव्याला येत असताना प्रमाथी नाम संवत्सर शके १७४१ मधील चातुर्मास व्रताचरण (1819 A.D.) गोव्यातील माशेल गावांत केले.

तीर्थ यात्रांच्या दरम्यान लागोपाठ तीन चातुर्मास आचरण्यात आले यावरून या तीर्थयात्रा किती खडतर होत्या याची आपण कल्पना करूं शकतो.

यावरून श्री आनंदतीर्थांनीही बऱ्याच यात्रा केल्या होत्या असे दिसून येते.

श्री आनंदतीर्थाच्या कारकीर्दीतल्या कांही ठळक घटनाः

शके १७४६ ज्येष्ठ शु. ७ मीला श्रीआनंदतीर्थ स्वामींनी माशेल येथून काशीच्या पंचगंगा घाटवरील अनंत भट उजे यांना आज्ञापत्र लिहून कळविले की दरवर्षी तुम्हास ५० रूपये पाठवीत जाऊं. या रकमेतून "तेथील मठ भाडेंस सालाबाद मठ खर्च वजा करून बाकी रुपये राहातील ते सुध्दा तुम्ही खर्च करून श्रीची पूजा अविच्छिन्न चालवून तेथ मठाचा परामर्श वरचेवर करीत असावे" ५० रूपयांहून अधिक रकम पाठवायला हवी असे स्वामीजींना वाटते, परंतु 'येथे दिवसेंदिवस ग्रहस्त काळ कठिण आहे' या शेवटच्या वाक्यावरून ते शक्य दिसत नाही असे स्वामींना सुचवायचे असावे.

शके १७४७ फाल्गुन कृष्ण ३ येला सौंदेकर राजे बसवलिंग महाराज व त्यांचा कुमार सदाशिव महाराज यांनी पर्तगाळ मठाला भेट दिल्याची किर्दीत तपशीलवार नोंद आहे. सौंदेकर राजे त्यावेळी कायम वसतीला बांदोडे येथे असत. हैदरअलीच्या स्वारीमुळे हे राजघराणे शके १७१३ च्या सुमारास तिथे येऊन राहिले होते.

तृतीयेपासून अष्टमीपर्यंत पांच दिवस सौंदेकर राजे व युवराज यांचा मुक्काम

पर्तगाळी मठात होता असे दिसते.

शके १७४८ च्या मार्गशीर्ष कृ. ६ चे श्रीआनंदतीर्थ संचारार्थ बाहेर पडले असतांना कुमठ्याहून एक लहानसे पत्र आपले शिष्य पूर्णप्रज्ञतीर्थ यांस त्यांनी पाठविले आहे. यावरून शिष्याच्या अध्ययनाबाबत श्री स्वामी किती जागरूक असत याची कल्पना येते. त्यांत ते म्हणतात, "...तर तुम्ही दुसरे ठायिं चित्त न ठेवितां व्यासंगावर लक्ष ठेऊन देवपूजाहि संकोचित करून रात्रंदिवस पाठ म्हणत असावे."

गोमंतकातील सारस्वत ब्राह्मणांची भिक्षुकी कृत्ये तसेच देवस्थानांतील वृत्ति द्रविड ब्राह्मणांकडे होती. कारण सारस्वतांमध्ये वैदिकी असली तरी भिक्षुकी पेशा नव्हता. हा पेशा करणारी पुरोहित घराणी सारस्वत ब्राह्मणात निर्माण व्हावी असा प्रयत्न कांही आचार्यांनी केलेला दिसतो. यापैकी श्रीआनंदतीर्थ हे एक. त्यांनी शके १७४९, आषाढ व. २ ला मालवणचे कृष्ण लाडे प्रभु व विठो प्रभु झांट्ये यांना एक आज्ञापत्र लिहून स्वज्ञातीय पुरोहितास तुमच्याकडे पाठवीत आहोत. त्यांच्याकडून हव्यकव्यादि सर्व वैदिकधर्म यथास्थित चालवून घ्यावे. कारण "ते प्रांति आमचे गृहस्थ वास्तव्य करून आहोत त्यांचे तेथ हव्यक्यादिक पुरोहित परज्ञातीचे ब्राह्मण भेद करितात वैदिक कर्म यथोचित चालवित नाहीत." असे आपणास समजले आहे.

असे हे विरक्त पण व्यवहारनिपुण कर्तबगार यतिवर्य पर्तगाळ मठांत सर्वधारि संवत्सरांत १७५० (1828 A.D.) श्रावण शुद्ध ९ मोक्षारूढ झाले.

शके १७५२ म्हणजे इ.स. १८३० हा काळ एकूण भारताच्या दृष्टीने इतिहास वादळाचा होता. दिल्लीची मोगल बादशाही संपूर्णपणे नष्ट झाली नसली तरी ती सत्ताशून्य बनली होती. सन १८१८ मध्ये पेशवाई बुडवून इंग्रज सरकार भारतावर स्वामित्व माजवूं लागले होते. दक्षिणेकडील निजाम, म्हैसूर, कोचीन, त्रावणकोर सारखी संस्थाने सोडली तर बहुतेक प्रदेश इंग्रजाकडे आला होता. गोकर्ण पर्तगाळ मठाच्या संदर्भात तत्कालीन राजकारणाचा विचार केला तर काणकोण पासून गंगावळी नदीपर्यंत पसरलेल्या शिवेश्वर महालाचे चाळीस वर्षामागेच दोन तुकडे होऊन उत्तरेचा पोळे पर्यंतचा तुकडा पोर्तुगीजांकडे आला होता, तर दक्षिणेकडचा तुकडा इंग्रज कंपनीकडे गेला होता. पर्तगाळी पोर्तुगीजांच्या प्रदेशांत तर रिवण व डिचोली वगळता इतर सर्व उपमठ इंग्रज मुलुखात अशी विभागणी कायम होऊन गेली होती. शककर्त्या शालीवाहनाची आठवण बुजत जाऊन ७८ वर्षे पूर्वी जन्म

पावलेल्या ख्रिस्तापासून कालगणना करण्याचा नवा क्रम सुरू झाला होता.

राजकीय इतिहासांत असा बदल झाल्यामुळे त्याचा भारतीय समाज परिस्थितीवर परिणाम होणेही अपरिहार्य होते. जुने जाऊन त्याची जागा नवे घेऊ लागली होती. जुन्या पध्दतीचे शिक्षण जाऊन इंग्रजी शिक्षण व पाश्चात्य ज्ञान शिकण्याच्या शाळा निघू लागल्या होत्या. त्यांत पांढरपेशा समाज आणि त्यात सारस्वत ब्राह्मणही आलेच. गोव्यातील जुन्या काबिजादींतील पोर्तुगीज संस्कृतीचे हिन्दू समाजावर आक्रमण पूर्वीच झाले होते. पण काणकोणसारखे नवे महाल त्या सरकारकडे गेल्यास अर्धशतकाचा काळ उलटला होता. त्यामुळे या प्रदेशांतील हिंदू समाजावर पोर्तुगीज सत्तेचे परिणाम होऊ लागले होते. शके १७५० संवत्सरीं जे श्री पूर्णप्रज्ञतीर्थ श्रीगोकर्ण पर्तगाळ मठाधिपती बनले त्यांच्या कारकीर्दीतच हा मठ स्वामीजीचा नसून महाजन मंडळीचा आहे व त्यासाठी सरकारचे त्यावर नियंत्रण असले पाहिजे अशा प्रकारचा विचार पुढे करून मठाच्या व्यवस्थेसाठी सरकारने कमिटी नेमली होती त्यामुळे जुन्या व नव्या राजसत्ताच्या दृष्टिकोनांत किती फरक होता याची कल्पना येईल.

हा फरक समाजातील धर्मविषयक कल्पनांत व आचारविचारांतही पडू लागला. थोडे का होईना. समाजसुधारणेचे कार्य करणारे नव्या विचाराचे सुधारक निर्माण होण्याचा हा प्रारंभकाळ होता. बहुसंख्य परंपरागत मार्गाने जाणारा स्थितिप्रिय समाज त्यांना विरोध करूं लागला होता. त्यामुळे काही जातील अपक्वता, जातिबहिष्कार वगैरे प्रकारचे कलह निर्माण होऊ लागले होते.

या सर्व गोष्टीचा विचार केला तर श्रीगोकर्ण पर्तगाळ संस्थानच्या इतिहासात पूर्णप्रज्ञतीर्थ स्वामींच्या कारकीर्दीपासून आधुनिक कालखंडाला सुरुवात होते असे म्हणायला हरकत नाही. श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांचे शिष्य श्रीपद्मनाभतीर्थ आणि त्यांचे शिष्य श्री इंदिराकांत तीर्थ यांच्या कारकिर्दीत ग्रामण्याची संख्या वाढत गेली. समाजाच्या पीठावरील निष्ठेला तडे जाऊ लागले, समाज विस्कळीत होऊन दुही माजली. एकीबेकीसारखी खळबळजनक प्रकरणे निर्माण झाली, प्रौढ व तरुण यांच्यामध्ये एका पिढीइतके अंतर निर्माण झाले. पीठाधीश हे मुळी समाजाचे धार्मिक शास्ते आहेतच काय? असे सवाल विचारण्यात येऊ लागले. पण एका शतकानंतर तर हे सर्व प्रश्न काळाच्या उदरांत गडप झाले.

पण हा सारा गेल्या शतक-सव्वा शतकाचा इतिहास. पूर्णप्रज्ञतीर्थांच्या काळी या

इतिहासास प्रारंभ होत होता म्हणूनच या अठराव्या आचार्यापासून आजच्या २३ व्या आचार्यापर्यंतच्या सहा पीठाधीशांचा परिचय या स्वतंत्र प्रकरणांत करून देण्याचे ठरवित आहे आणि या कालखंडास 'गोकर्ण पर्तगाळी मठाच्या इतिहासांतील आधुनिक कालखंड' असे त्याचे नामकरण करीत आहे.

## श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांच्या कारकीर्दीत सहस्रभोजन

१) श्रीशके १७५६ (1834 A.D.) विठ्ठल प्रभु देसाई बोरूसकर यांजकडून सहस्रभोजन.

२) श्रीशके १७५८ (1836 A.D.) कृष्ण शेणवी धेंपे, पणजी यांजकडून श्रीपर्तगळमठी श्रीसन्निधींत सहस्र ब्राह्मण भोजन.

३) श्रीशके १७६१ (1839 A.D.) फाल्गुन शु. प्रतिपदा ते दशमी पर्यंत श्रीस्वारीचे वास्तव्य श्रीनागेश देवस्थानी असता श्रीनिवास शेणवी धेंपे यांजनडून सहस्र भोजन.

४) श्रीशके १७६३ (1841 A.D.) श्रीपर्तगाळीमठी श्रीपादांकडून सहस्र भोजनाचे आयोजन.

५) श्रीशके १७७४ (1852 A.D.) रामचंद्र श्रीधर आचार्य, लोलिये यांजकडून सहस्रभोजन.

६) श्रीशके १७९० ( 1868 A.D.) पैंगीणी परशुराम देवालयी श्रीपादां कडून सहस्रभोजन.

७) श्रीशके १७९९ (1877 A.D.) श्रीपर्तगाळमठीं वैशाखमासांत श्रीपादां कडून सहस्रभोजन.

# न्यायनिष्ठ विद्वान् श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ

श्री पूर्णप्रज्ञतीर्थ स्वामी हे पूर्वाश्रमीचे गणपति भट मठकार. कारवार तालुक्यातील मुडगेरी मठाचे मठकार विठ्ठल भटजी यांचे व्दितीय पुत्र. पर्तगाळ मठांत गुरु श्री आनंदतीर्थ यानी संन्यास दीक्षा दिली. यांची कारकीर्द दीर्घ मुदतीची म्हणजे पूर्ण ५१ वर्षाची झाली. शके १८०१, प्रमाथी संवत्सराच्या ज्येष्ठ शुध्द व्दितीया या दिवशी पर्तगाळी मठांत त्यानी समाधी घेतली.

पूर्णप्रज्ञतीर्थांनी स्वतः अध्ययनांत खूप काळ घालविला होता. श्री मध्वाचार्यांच्या ब्रह्मसूत्राचा त्यांचा जबरदस्त व्यासंग होता. मध्वाचार्यांचे इतर ग्रंथही त्यांनी अभ्यासिले होते व इतर अभ्यासकांसही ते स्वतः पाठ देत होते.

पूर्णप्रज्ञतीर्थांच्या कारकीर्दीच्या आरंभीच ते संचारासाठी उत्तर व दक्षिण कानडा जिल्ह्यात गेले. या दौऱ्यावर असताना शके १७५२ च्या फाल्गुन शुध्द प्रतिपदेला भटकळहून त्यांनी कर्नाटकांतील स्ववर्गीय समाजास रायस पाठवून कळविले की, त्यांनी काशी मठाच्या आचार्यांकडून मंत्रोपदेश वा मुद्राधारणही करून घेऊ नये. याचे कारण म्हणून त्यांत सांगितले आहे की पूर्वी आपले गुरुवर्य या बाजूला संचारार्थ आले असताना काशी मठाचे आचार्य बिभुधेंद्रतीर्थ यांनी अशा प्रकारचा मज्जाव आमच्या स्वामींच्या बाबतीत केला होता.

सारस्वतांचे वैष्णव मठ स्थापन होण्यापूर्वी कोंकण, मलबार व केरळमधील सर्व सारस्वत उत्तरादी मठाचे अनुयायी होते. (Dakshinatya Saraswats, P. 189, 196) या मठाच्या रामचंद्रतीर्थांनी समाधी घेतल्यावर त्यांचे दुसरे शिष्य विभुदेंद्रतीर्थ यांनी स्वतंत्र कुंभकोणम् मठ स्थापन केला - त्याला पुढे राघवेंद्र मठ असे नांव पडले. इतर कानडा जिल्ह्यातील भटकळपर्यंतच्या वैष्णव सारस्वतांनी कुंभकोण उत्तरादी मठाचे अनुयायित्व कायम ठेवले तर मंगळूरच्या दक्षिणेला मलबार पट्ट्यांत मठांचे अनुयायी होते. नंतरच्या काळांत वैष्णव सारस्वतांचे गोकर्ण व काशी मठ स्थापन झाल्यानंतर साधारणपणे हीच परिस्थिती चालू राहिली. गोवा, उत्तर व दक्षिण कानडा, बेळगांव, दक्षिण कोंकण, राजापूर, मुंबई आणि उत्तरेकडील काही शहरे हे प्रदेश गोकर्ण, पर्तगाळी मठाच्या प्रभावक्षेत्राखाली होते, तर दक्षिण कानडा, मंगळूर,

मलबार किनारा, कोचीन, त्रावणकोर इ. प्रदेश काशी मठाच्या अधिकारक्षेत्रात होते. दक्षिण कानडा हा एकच जिल्हा संयुक्त प्रभावाखाली होता. पण त्यामुळे या दोन मठात संघर्ष येण्याचे कारण नव्हते पण तरीही पूर्णप्रज्ञतीर्थांच्या कारकीर्दीपूर्वी कित्येक वर्षी या दोन मठात वैमनस्य निर्माण झाले होते. ही गोष्ट खरी. दोन्ही मठांचे अनुयायी आपल्या वर्गाने दुसऱ्याच्या संप्रदायात समाविष्ट होऊ नये म्हणून जपत होते.

परंतु आनंदाची गोष्ट ही की बरीच वर्षे या दोन मठांमध्ये चाललेला हा वाद स्पर्धा व कटुता यांस विराम मिळण्याची पहिली संधी खुद्द श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांच्या कारकीर्दीत फक्त ४० वर्षांच्या आत आली असे कागदपत्रातून दिसते. शके १७९० श्रावण शु. ५ ला पूर्णप्रज्ञतीर्थाचे शिष्य श्रीपद्मनाभतीर्थ यांस कोचीहून काशीमठाचे भुवनेंद्रतीर्थ यांनी संस्कृत भाषेत एक पत्र लिहिलेले उपलब्ध असून त्यात 'आपण गोकर्णमठास भेट म्हणून एक छत्र पाठवीत आहे आणखी हवे असल्यास कळवावे, असे लिहिले आहे. या पत्रांमुळे या दोन मठांमधील वैमनस्य कमी होत असल्याचा पहिला पुरावा मिळाला. हा बदल कोणत्या कारणांमुळे या परिस्थितीमुळे घडून आला याची मात्र कांही कल्पना करतां येत नाही. कुणी समझोता करण्याचा प्रयत्न केला असेल किंवा खुद्द मठाधिपतींनीच सारासार विवेक करून योग्य ती पावले उचलली असतील. पुढे कांही वर्षानंतर इंदिराकांततीर्थ स्वामींजीनी पुढाकार घेऊन व या अप्रिय स्पर्धेवर कायमचा पडदा पाडला.

श्री पूर्णप्रज्ञतीर्थांच्या कारकीर्दीतील बरेच कागद संस्थान दफ्तरात आहेत. त्यातील अनेक कागद व्यवहारविषयक आहेत. या व्यवहारविषयक कागदाशिवाय इतर जे थोडे महत्वाचे कागद उपलब्ध आहेत त्यांची दखल या ठिकाणी घेत आहे.

फाल्गुन वद्य ६ शके, १७६१ चे एक आज्ञापत्र श्री स्वामींनी लिहिले आहे एक संन्यासी सावंतवाडीला गेले असता त्यांस सावंतांनी अडकविले तेव्हा त्यानी आपण गोकर्णमठाचे शिष्य असल्याचे सांगितले. म्हणून सावंतानी श्रीपद्मनाभतीर्थांकडे चौकशीसाठी मनुष्य पाठविला व "हे शिष्य खरे की काय ते लिहून कळवणे"

श्री पूर्णप्रज्ञतीर्थ हे अत्यंत विद्वान व विरक्त आचार्य म्हणून त्या काळी मान्यता

पावले होते त्यांचे अध्ययन प्रथम स्वतः श्री आनंदतीर्थ व नंतर भटकळ येथील विद्वान पंडीत अनंत पुराणिक यांच्याकडे झाले आणि नंतर स्वाध्यायाव्दारे त्यांनी आपले ज्ञान वाढविलें. या अध्यात्मज्ञानाचे हे स्वयंकेंद्रीत बनले नाहीत आपण एका संप्रदायाचे प्रतिनिधी आहो आणि समाजासाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे. इतर प्रकारे समाजाला आपल्या हाती असलेल्या साधनांचा व धर्म सत्तेचा उपयोग केला पाहिजे याचे त्यांस भान होते. म्हणूनच त्यानी अनेकांना विद्यादान करण्यातच आपल्या कालाचा सदुपयोग केला.

आपल्या पन्नास वर्षाच्या दीर्घ कारकिर्दीत शिष्य श्रीपद्मनाभतीर्थ यांची मठाच्या कारभाराच्या बाबतीत त्यांना खूप मदत झाली. त्यांच्या कारकीर्दीत संस्थानची आर्थिक स्थिती सुधारत चालली होती व काही जमिनींची दानपत्रेही मिळत होती, कांही जमिनी विकतही घेतल्या होत्या. परंतु खुद्द गुरुस्वामीनी तीन जमिनी विकत घेतल्याची नोंद असून शिष्य स्वामीनींच अधिक जमिनी खरेदी केल्याचे वारनिशीवरून दिसते.

## श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांकडून
## शास्त्राध्ययन

१) (1841 A.D.) नारायण भट्ट कागल
दामोदर अनंत प्रभू या दोघांला 'तत्वप्रकाशिका' आरंभ.

२) (1843 A.D.) नारायण भट्ट कागल
दामोदर अनंत प्रभु
विठ्ठोबा तामने तिघास 'सुधाग्रंथा' रंभ.

३) (1853 A.D.) नारायण भट्ट देऊळकार
वासुदेव महादेव प्रभु देसाई
श्रीधर वेंकटेश भट्ट यांना 'तत्वप्रकाशिका' सांगण्यास प्रारंभ.

४) (1874 A.D.) शिष्यश्री पद्मनाभ तीर्थास
'सुधा', प्रथमाध्याय पूर्ण.

## पोर्तुगीज सरकारचा हस्तक्षेप

श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांच्या कारकीर्दीतील एका महत्वाच्या घटनेचा उल्लेख येथे अप्रस्तुत ठरूं नये.

श्रीगोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठ म्हणजे एक गुरुपीठ असून या पीठाचा अंतर्गत कक्षा वहीर्गत कारभार पीठाधिष्ठित आचार्य पहात असत असे दिसून येईल. धार्मिक अधिकार तर त्याना स्वयंभूच होते. आदिलशाहीपासून इंग्रजापर्यंत ज्या राजवटी झाल्या त्यात जमिनी वा मानमरातब वा इतर काही प्रश्नाबाबत सरकारदरबारी पत्रव्यवहार होई. तक्रारी, अर्ज होते ते एकतर स्वतः स्वामी करीत किंवा त्यांनी मुखत्यारी दिलेले लोक करीत. परंतु पोर्तुगीज राजवट काणकोणमध्ये सुरू झाली आणि त्यानंतर सुमारे पन्नास वर्षांनी सरकारने पर्तगाळ मठाच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. प्रश्न निर्माण झाला तो पर्तगाळचा मठ हा स्वामींच्या मालकीचा आहे की महाजनांच्या? कुणीतरी चुगली केली आणि मठावर महाजनांचा अधिकार असल्याचे गोवा सरकारला सुचविले. याबाबत मग शके १७६८ (इ.स. १८४६) मध्ये चौकशीस प्रारंभ झाला आणि शके १७७४ मध्ये मठाचा कारभार चालविण्यासाठी सरकारने दोन समित्या नेमल्याचे जाहीर केले. सरकारचा या बाबतचा निर्णय सरकारी गॅझेटमध्ये १७ मे १८५२ या दिवशी प्रसिध्द झाला. नंतर सन १८६६ सालांत गोव्यांतील देवालयासंबंधीचा कायदा तयार केला हा कायदा पर्तगाळी मठाला व तेथील देवालयाला लागू करूं नये यासाठी प्रयत्न स्वामीजींतर्फे करण्यात आले. हे देवालय व मठ कुणा विशिष्ट महाजन मंडळीचे नसून सारस्वत ब्राह्मणामधील समस्त वैष्णव संप्रदायातर्फे आपण विश्वस्त म्हणून कारभार पहात असून ते एक स्वतंत्र संस्थान आहे असे स्वामीनी निवेदन केले. पुढे हे सर्व प्रकरण पोर्तुगालपर्यंत जाऊन देवालयाचा कायदा पर्तगाळ मठास लागू करू नये असा शेवटी निवाडा झाला. पण हे होईपर्यंत श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ समाधिस्थ झाले होते व त्याच्या जागी पीठाधीश म्हणून श्री पद्मनाभतीर्थ आले होते हा सर्व विषय एका स्वतंत्र प्रकरणांत पुढे द्यायचा असल्यामुळे या ठिकाणी त्याचा विस्तार करीत नाही.

# स्वत्व रक्षणार्थ संघर्ष

श्रीगोकर्ण पर्तगाळ जीवोत्तम मठाच्या परंपरेतील सहावे आचार्य श्री रामचंद्रतीर्थ यांनी इ. सन १६५६ साली पर्तगाळ मठ वास्तू निर्माण केली. श्रीराम, सीता, लक्ष्मण व हनुमान यांच्या मूर्ति त्यांनी गोकर्णहून आणल्या. तीन मूर्ती आज जिथे मठ आहे तिथे त्या स्थापन केल्या. मंदिर व मठ यांच्या स्थापनेसाठी गोमन्त प्रदेशांत राहाणाऱ्या माध्वमतानुयायी सारस्वत ब्राह्मणांची मदत झाली होती. अशा लोकांचे कुलदेव वेगळे होते व दूर होते म्हणून श्रीरामचंद्रतीर्थ यांनी पर्तगाळ येथे आणलेल्या श्रीरामाला ते आपला ग्रामदेव मानू लागले. रामनवमी आदि उत्सव करूं लागले. मठाच्या व राममंदिराच्या सेवेत भाग घेऊ लागले. पर्तगाळीजवळच्याच गांवी रहात असल्यामुळे या लोकांचा - ज्यांना पुढे पर्तगाळी सासष्टीकर या नावाने संबोधण्यात येऊ लागले - मठाशी जवळचा संबंध येऊ लागला. या पर्तगाळी सासष्टीकरा प्रमाणेच सर्व दाक्षिणात्य सारस्वतांतील माध्वमतानुयायांचा श्री गोकर्ण - पर्तगाळ मठाशी आचार्यपीठ म्हणून संबंध होताच. यांच्यापैकी अनेकांनी संस्थानला जमिनी, ठिकाणे व रोख रकमा आदी प्रकारानी मदत केली होती आणि प्रत्यक्ष श्रमदानही केले होते. याशिवाय श्रीसंस्थानच्या निधीतून अनेक जमिनी, ठिकाणे, शेते विकत घेण्यात आली होती. सोन्या-चांदीचे अलंकार श्रीच्या मूर्तीसाठी खरेदी करण्यात आले होते, तसेच इतरांनी दानहि दिले होते. संस्थानच्या अग्रशाळा, पुरोहित, पुजारी इ. ब्राह्मणांसाठी व इतर सेवेकऱ्यांसाठी घरे बांधण्यात आली होती. खुद्द मठाची इमारत होती. पर्तगाळ मठाची मालमत्ता हळूहळू वाढू लागली.

अशा प्रकारे पर्तगाळ मठ स्थापन झाल्यापासून सुमारे दोनशे वर्षे गेली आणि सन १८४६ च्या सुमारास कांही स्वकीय लोकांनी एक वाद निर्माण केला. पर्तगाळ मठाची मालमत्ता कोणाची? संस्थानची की स्वकीय वर्गाची? ती स्वामीजींची की समाजाची? मठातील रामदेवाचे देवालय कोणाचे? इतर सर्व देवालयाचे महाजन आहेत तसे रामदेवाचे महाजन कोण? पर्तगाळ सासष्टीकर की सर्व वैष्णव सारस्वत?

आणि मग सरकारात कुणीतरी चुगली केली की, श्रीस्वामीच्या पर्तगाळ मठात देवालय आहे आणि मठ व देवालय मिळून एकच संस्था आहे. म्हणून इतर देवालयांप्रमाणेच पर्तगाळ मठाचा कारभार स्वामीऐवजीं कारभारी मंडळामार्फत चालवण्यात आला पाहिजे. यावेळी पीठाच्या परंपरेचे १८ वे आचार्य श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ विद्यमान होते.

अशा प्रकारची चुगली करण्यास अनुकूल संधीही प्राप्त झाली होती. गोव्यांतल्या देवालयांतील गैरप्रकारामुळे म्हणा किंवा हिंदूच्या धार्मिक संस्थावरही अप्रत्यक्ष ताबा मिळविण्याच्या हेतूने म्हणा, सरकारने सर्व देवालयांतील आपापल्या मालमत्तेची नोंद करून सरकारला सादर करावी असा हुकूम काढला होता. हा हुकूम तालुक्याच्या आदमिनिस्त्रादोरामार्फत (प्रशासक) अंमलांत आणावयाचा होता. त्यावेळी काणकोण तालुक्यासाठी स्वतंत्र प्रशासक किंवा मामलेदार नव्हता. फोंडा तालुक्याच्या मामलेदाराच्या अधिकारात आपला काणकोण होता. त्यानी रेजेदोरामार्फत गावातल्या देवालयांच्या मालमत्तेच्या नोंदी मिळविण्याचे ठरवून सर्व रेजेदोरांना हुकूम काढले. त्या यादीत पर्तगाळ मठाचे नांव नव्हते.

सरकारमार्फत ही कारवाई झाली नाही हें पाहून कांही विघ्न संतोषी लोकांनी रेजेदोराकडे चुगली केली की पर्तगाळ मठ हे सुध्दा एक देवालय असून सासष्टीकर सारस्वत हे त्याचे महाजन आहेत. तेव्हा त्यांनाही मालमत्ता नोंदीचा हुकूम लागू व्हावा. तसेच या देवालयाचा कारभार इतर देवालयाप्रमाणेच कमिटीमार्फत चालावा. रेजेदोराकडून मामलेदार व मामलेदारकडून गव्हर्नरकडे ही तक्रार गेली आणि पर्तगाळ मठ हें देवालय समजून त्याप्रमाणे कारवाई करण्यात येणार असल्याची वार्ता कळली. शिष्यस्वामी श्रीपद्मनाभतीर्थ यांनी पुढाकार घेऊन या योजनेला विरोध केला. कारण गोकर्ण-पर्तगाळ मठ हा सर्व वैष्णव संप्रदायी सारस्वत ब्राह्मणांचा आणि तात्विक दृष्ट्या तो या सर्वांचा असला तरी मठाची मालमत्ता ही संस्थानची आहे. मठाचे किंवा राममंदिराचे कुणी महाजन नाहीत, मठाचा कारभार श्रीस्वामी केवळ विश्वस्त म्हणून चालवितात. त्यांच्या वैयक्तिक मालकीचा तो मठ आहे अशी पीठाधीशांची भूमिका होती.

त्याप्रमाणे म्हापशाहून कायदेपंडित जोशी यांनी श्रीस्वामीजींच्या आदेशानुसार कागद तयार करण्यात आला व तो सरकारला सादर करण्यात आला. कागदाबरोबरच मालमत्ता देवालयाची असली तरी त्याचा कारभार करण्याचा हक्क श्रीस्वामींना असावा असा अर्ज गर्व्हनरना करण्यात आला व गर्व्हनरनी तो आपल्या अनुकूल अभिप्रायासह लिस्बनला पाठविल्यावर खुद्द राजाज्ञेने तो मान्य झाला.

सरकारने पर्तगाळी मठाच्या 'महाजनास' सरकारी गॅझेटवर जाहीर नोटीसा देऊन सभेला निमंत्रण दिल्याचे आणि या सभेस एकही महाजन हजर न झाल्याचे

वर्तमान सरकारी गॅझेटच्या दि. २१ मे १८५२ च्या क्र. २१ च्या अंकात, जी. क्र. ६७ ची १७/५/१८५२ ची पोर्तारीय (वटहुकूम) प्रसिध्द झाले आहे. ती अशी - "O. Governador Geral do Estado da India determina ao seguinte-

Constando - me pela participacao do comissario encarregado de tomar contaodas pagode que sendo convidados por editais e anuncios publicados Boletim do Governo, mazanes do moto de Partagale para a mesa administrativa do referido pagode nao compareceram nem deles conformando me comproposta que o referido comissario que dirigiu em sen oficio no. 49 de 1 de currente"

देवालयाच्या मालमत्तेची माहिती मिळविण्यासाठी नेमलेल्या कमिशनने गव्हर्नरला केलेल्या रिपोर्टावरून त्याने बोलावलेल्या महाजनांच्या सभेस एकही महाजन आला नाही हे वरील पोर्तारीत प्रथमच नमूद करण्यात आले आहे आणि मग अशा परिस्थितीत आपण स्वतःच निवडणुका होईपर्यंत मठाच्या कारभारासाठी एक कारभारी मंडळ व एक तपासणी मंडळ नेमीत आहे असे पुढे म्हटले असून पुढीलप्रमाणे लोकांच्या त्या त्या मंडळावर नेमणुका केल्या आहेत.

कारभारी मंडळः अध्यक्ष- केशव कामत, पानवेल, खजिनदार- श्रीनिवास शेणवी धेपे, नवा गोवा, चिटणीस- श्रीधर कामत, असोळणे, अखत्यार- व्यंकटेश कामत खाडियो, कुंभारजुवे, तपासणी मंडळ- उष्णो नाईक खाडियो, कुंभारजुवे, राम कुष्ट कामत घाणेकार, नवा गोवा, गिरी नाईक, कुंभारजुवे.

ही पोर्तारीय प्रसिध्द होऊन जवळ जवळ एक वर्ष लोटले, परंतु ही मंडळे फक्त कागदावरच राहिली. सभासदानी एकत्र येऊन कारभारी मंडळाने कामास सुरुवात करावी अशा नोटिसा सरकारमार्फत वरील सर्व गृहस्थाना गेल्या. परंतु कारभारी मंडळाचे चिटणीस श्रीधर कामत आणि अखत्यार व्यंकटेश कामत खाडिये हे सभांस गैरहजर राहिले म्हणून गव्हर्नरने १८ एप्रिल १८५३ रोजी क्र. 16 ची पोर्तारीय क्र. 55 दि. २२/४/१८५३ च्या सरकारी गॅझेटवर प्रसिध्द करून वरील दोघांऐवजी दुसऱ्या दोन गृहस्थांची नियुक्ती केली. ती अशीः- श्रीधर कामत, असोळणे यांच्या जागी कुष्ट पै, काणकोण, व्यंकटेश कामत खाडिये यांच्या जागी उपेंद्र गणेश प्रभुदेसाई, लोलये. नवे कारभारी मंडळ नेमले खरें, पण नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने म्हणतात तशी या प्रकरणी सरकारची परिस्थिती झाली होती. या दोघांपैकी उपेंद्र गणेश प्रभुदेसाई यांना कोणत्या तरी आरोपावरून पकडण्यात येऊन तुरुंगात

ठेवण्यात आले आणि कारभारी मंडळाच्या इतर तीन सभासदानी मठाच्या कारभारात कोणत्याच प्रकारचा रस घेतला नाही. ही गोष्ट तीन वर्षानंतर सरकारच्या नजरेस आली! २८ मे १८५६ रोजी काढलेल्या व सरकारी गॅझेटच्या ३१ मे १८५६ च्या क्र. ४२ च्या अंकांत प्रसिध्द झालेल्या पोर्तारीचा नं. ७५ प्रारंभच गव्हर्नरने असा केला आहे:-

"Constando - me que Upendra Gonessa Porobo Dessai, um dos membros da Comissao Administrativa do pagode de Partagale nomeado pela portaria deste Governo de 18 de Abril de 1852, se acha preso e os outros memberos se tem mostrado pouco zeloso na Administracao do dito pogode."

आणि म्हणून याच 'पोर्तारीय'च्या व्दारे पूर्वीचे सबंध कारभारी मंडळ बरखास्त करून नवीन मंडळ नेमले ते पुढीलप्रमाणे:- अध्यक्ष- बाबय व्यंकटेश प्रभु धैपडकार गांवकार, लोलये; चिटणीस- व्यंकटेश सुबा प्रभु देसाई, लोलयें; खजिनदार- श्रीनिवास गणेश प्रभुदेसाई, लोलये; अखत्यार- नारायण येसो वारीक गांवकार, लोलये. या नव्या कारभारी मंडळातील सभासदांची नावे पाहिल्यास दोन गोष्टी ताबडतोब लक्षांत येतात. हे सर्व गृहस्थ लोलये गांवचे आहेत. याचा एक अर्थ हा की दूरवर असणारे चार गांवचे चार कारभारी एकत्र येऊन मठाचा कारभार हांकणे कठीण आहे ही गोष्ट सरकारच्या लक्षात आली आणि मठाला जवळ असलेल्या मठानुयायांचे कारभारी मंडळ मठाच्या कारभारात विशेष लक्ष घालील आणि पर्यायाने सरकारचा मठावर ताबा राहील असा सरकारचा अंदाज असावा.

परंतु हा अंदाज खरा ठरला नाही. या कारभारी मंडळाने एकूण साडेतीन वर्षे कारभार केला. पण हे कारभारी मंडळ अकार्यक्षम असल्याचे सरकारला दिसून आले. या मंडळाने कारभाराकडे दुर्लक्ष केले आणि मठाच्या बागायती व जिरायती जमिनी पडित ठेवल्या असल्याचेही ॲडमिनीस्ट्रेटरच्या लक्षांत येऊन चुकले व त्याने तसा अहवाल गव्हर्नरकडे पाठवून दिला.

या साडेतीन वर्षाच्या काळात श्रीस्वामीनीही कारभारी मंडळामार्फत संस्थानचा कारभार चालू न ठेवता पूर्वीप्रमाणे तो आपल्या अखत्यारीत यावा म्हणून प्रयत्न केले. वर जोशी घराण्यातील कायदेपंडितामार्फत प्रयत्न केल्याचा उल्लेख आला आहे तो याच कालातील असावा. या घटनांचा इष्ट परिणाम घडून आला तो १२ डिसेंबर

१८५९ रोजी १७१ क्रमांकाची जी पोर्तारीय सरकारी गॅझेटच्या दि. १३ डिसेंबर १८५९ च्या अंकांत प्रसिध्द झाली तीत नमूद झाला. या वटहुकूमात गव्हर्नर जनरल व्हिस-कॉंदि द तोर्रिस नॉव्हस याने कारभारी मंडळ बरखास्त करून मठाचा कारभार पूर्वीप्रमाणे मठाधिपती श्रीस्वामीनी चालवावा व सर्व दागदागिने कारभारी मंडळाने त्यांच्या स्वाधीन करावे असा हुकूम काढला आणि पुढे या हुकुमाची तामिलीही झाली.

## देवालयांसाठी कायदा

एवढ्याने हे प्रकरण कायमचे संपले नाही. सन १८६६ साली गोवा सरकारने देवस्थानासंबंधीचा पहिला कायदा तयार करून त्यानुसार गोव्यातील देवस्थानांनी आपली घटना तयार करून महाजनांच्या यादीसह ती सरकारांत नोंदवून घ्यावी असा हुकूम काढला. परंतु हा कायदा काणकोण तालुक्यात अंमलात आला नाही. कारण देवस्थानासंबंधीचा हा कायदा मामलेदारामार्फत अंमलात यावयाचा होता. काणकोण तालुक्यात तर मामलेदार कचेरी नव्हती. हा तालुका फोंडा तालुक्याच्या मामलेदाराच्या अधिकाराखाली होता. चार वर्षानंतर फोंडा तालुक्याच्या मामलेदार कचेरीतून काणकोण तालुक्यांतील तमाम कुलकर्ण्यांना एक आदेश रवाना झाला. पैंगीण गावचे कुलकर्णी भीम शेषया यांसही तो आला. त्या गावातील देवालयांची सविस्तर माहिती पाठवून देण्याची आज्ञा त्यात देण्यात आली होती. या आदेशानुसार कुलकर्णी पर्तगाळ मठात माहिती मिळविण्यासाठी गेले. पण त्यावेळी आपणास शिष्यस्वामी श्रीपद्मनाभतीर्थ भेटले आणि त्यांनी भांडाराच्या किल्ल्या आपणाकडे नाहीत, त्या गुरुस्वामी श्रीपूर्णप्रज्ञतीर्थस्वामी जवळ आहेत व ते संचारासाठी परगांवी गेले आहेत असे सांगितल्याचा उल्लेख कुलकर्णी शेषया यांनी आपल्या १६ डिसेंबर १८७० च्या रिपोर्टात केला आहे. याच रिपोर्टात त्यानी पर्तगाळी मठात राण्यांनी केलेल्या लुटालुटीचाही उल्लेख केला आहे. मठाचा अलंकारादि ऐवज कुठे आहे ते सांगण्यासाठी राण्यांनी अर्चकाला नदीकांठी नेऊन त्याच्या पोटात बंदुकीची नळी भिडवून विचारणा केल्याचे व त्याने आपणास कांहीच माहीत नाही असे सांगितल्याचेही रिपोर्टात म्हटले आहे. परंतु राण्यांनी मठात लुटालूट केली नाही, फक्त अर्चकास विचारून मग सोडून दिले ही वस्तुस्थिती आहे. भीम शेषया कुलकर्णी यांनी हा जो रिपोर्ट फोंडा तालुक्याच्या मामलेदाराला पाठवला त्याची नक्कल स्वतःच्या दप्तरात ठेवली होती. ती त्याच्या नातवाचे जांवई वै. शा. सं. माधव सदाशिव भट टेंगसे, परशुराम

देवालयाचे अर्चक, यांनी कांही वर्षामागे देवालयाच्या कमिटीकडे सुपूर्द केली.

या घटनेनंतर कुसमण (केपे) तालुक्यात मामलेदार कचेरी स्थापन झाल्यावर काणकोण तालुका त्याच्या अखत्यारीत आला आणि त्यानंतर १८८० साली काणकोण तालुक्याला स्वतंत्र मामलेदार कचेरी मिळाली. ही कचेरी स्थापन झाल्यावर तालुक्यांतील सर्व देवालयांसाठी घटना करून सरकारांत नोंदविण्याचा (कोंप्रामीस करण्याचा) १८६६ सालचा कायदा काणकोण महालात ताबडतोबीने अंमलात आणण्याची सूचना सरकारकडून काणकोणच्या मामलेदारांना आली आणि मग पुन्हा एकदा पर्तगाळच्या दिशेने सरकारी चक्रे फिरूं लागली. मामलेदारांकडून पर्तगाळ मठाला - त्यात श्रीराममंदिर असल्यामुळे -कोंप्रोमीस करण्याचा आदेश सुटला.

यावेळी श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ यांचे निर्वाण झाले होते आणि पीठाधीश म्हणून श्रीपद्मनाभतीर्थ मठाचा कारभार पाहात होते. त्यांनी पहिली गोष्ट केली ती सरकारी आदेशानुसार आपल्या कायदेविषयक सल्लागारांकडून मठाची घटना तयार करून ६ डिसेंबर १८८० या दिवशी मामलेदाराकडे रवाना केली. या घटनेची मोडी लिपीतील नक्कल मठाच्या दफ्तरात उपलब्ध आहे.

पण स्वामीजीना या घटनेच्या जंजाळात अडकवून घ्यायचे नव्हते. पूर्वापार वहिवाटीप्रमाणे मठाचा कारभार चालावा असे त्यांना वाटत होते. फक्त कायद्याचे पालन केल्याचे दाखविण्याकरता त्यांनी घटना तयार करून ती मामलेदाराकडे पाठविली होती. म्हणून या बाबतीत खटपट करून कोंप्रोमीसाच्या कटकटीतून मुक्त होऊन देवालय कायद्यांतून वगळण्याचे प्रयत्न करण्यासाठी स्वतः श्रीपद्मनाभतीर्थस्वामी पणजीला गेले. ४ जुलै १८८१ रोजी गव्हर्नर जनरलला एक अर्ज करून त्यात मागची १८५२ सालापासून ज्या घटना घडल्याः उदा.- कारभारी मंडळे नियुक्त करण्यासाठी महाजनांची बैठक बोलावणे, त्याला कुणीही उपस्थित नसणे, नंतर सरकारने स्वतःच मंडळे नेमणे व अखेर आपल्या बाजूने निर्णय लागणे वगैरे - त्या सविस्तरपणे त्या अर्जात नमूद करून आपली पूर्वीचीच मागणी त्यांनी पुन्हा केली व देवालय कायदा पर्तगाळी मठाला लागू न करण्याची मागणी केली.

या अर्जावर गव्हर्नर जनरल आल्बुकेर्क याने अनुकूल अभिप्राय व्यक्त करून दि. ३ फेब्रुवारी १८८२ रोजी शेरा मारला व तो सरकारी गॅझेटमध्ये १८८२ च्या क्र. १४ च्या अंकांत प्रसिध्द केला त्याचे भाषांतर - "दि. २९/३/१८४९ सालच्या १३

नोव्हेंबरच्या बोलेती ओफिसियालवर प्रसिध्द झालेला आदेश व दि. १२/१२/१८५९ च्या सियालवर प्रसिध्द झालेला आदेश व दि. १२/१२/१८५९ च्या क्र. ९७ च्या बोलेतीवर प्रसिध्द झालेली पोर्तारी अवलोकून पाहता पर्तगाळी देवालयास महाजन नाहीत. वरून त्याची वहिवाट आज ज्याच्या अधिकारात आहे तशीच असावी आणि म्हणून पर्तगाळचे स्वामींस कोंप्रोमीस दाखल करण्याचे बंधन नाही. म्हणून तालुक्याच्या मामलेदाराने गत जानेवारी १२ तारखेच्या अहवालासोबत पाठविलेले लिखाण लक्षी घेतले नाही. दि. ३/२/८२ (सही) आल्बुकेर्क जी. जी. वरील शेऱ्यात मामलेदाराच्या रिपोर्टा सोबतच्या ज्या लिखाणाचा उल्लेख आहे ते लिखाण म्हणजे श्री स्वामींनी पाठविलेल्या कोंप्रोमीसची प्रत असावी.

स्वामींच्या अर्जावर गव्हर्नरने वरीलप्रमाणे शेरा मारला खरा, परंतु यासंबंधीचा कायम निवाडा पोर्तुगालहून आणावा असे त्यांस वाटले असावे म्हणून हे सारे प्रकरण श्रीस्वामींच्या अर्जासह पोर्तुगालला पाठविण्यात आले. तेथे आरमार व सागरोत्तर प्रदेश व्यवहार मंत्री ज्यूलियु मार्किश द व्हिल्येन यांनी दि. ११ ऑगस्ट १८८३ रोजी मठाला अनुकूल निवाडा देऊन हे प्रकरण कामयचे निकालात काढले. हा निवाडा १७ सप्टेंबर १८८३ च्या बोलेतीं ऑफिसियाल (सरकारी गॅझेट) वर प्रसिध्द झाला असून १६ सप्टेंबर १८८३ च्या अंकांत सूर्याजी आनंदराव देशपांडे यांनी केलेले मराठी भाषांतर प्रसिध्द झाले आहेः हे भाषांतर पुढे देत आहे -

''आरमार व समुद्रापलीकडील प्रांताचा राजकारभार समुद्रापलीकडील प्रांताचे साधारण देखरेखीचे खाते. प्रथम कचेरी. ''अंक ७० - महाराज राजे यांचे हुजुरास पद्मनाभतीर्थ हिंदु ब्राम्हणांचे गुरु, महाल काणकोण, इस्ताद दा इंद्य येथे पर्तगाळचे देवालयाचे इलाख्यासहीत याची अर्जी पोचली. त्या अर्जेत आपल्या इलाख्यातील काही जणांनी देवालय मजकूरचे संपत्तीचा कारभारातून आपणास वर्ज्य करावे अशा इराद्याने अलीकडे बखेडे उभारले आहेत, ते देऊळ संस्थापनेच्या हक्कावरून आद्यकालीन संस्थापक याचे अनुयायी गुरु यांसच अन्याचे संबंधाव्यतिरिक्त लागू होय असे कथन करून भविष्यकालीन संशयनिवारणार्थ इस्ताद मजकुराचे गोवेर्ण जराल् यांनी साल गुदस्तांचे ३ माहे फेब्रेर मितीस शेरा सादर केला. त्याजवरून फर्माविले आहे की सदर संपत्तीचा कारभार कोंप्रोमीस सिध्द करण्याचे लग्निक गिरीवांचून अर्जदार त्यांचे हातात असावा, कारण संस्थापक महाजन समुदायाची

समाईक मंडळी नाही.तो शेरा बहाल करावा अशी मागणी करीत आहे, अशास सदर प्रकरणाविषयी इस्ताद द इंद्य येथील प्रस्तूतचे गोव्हेर्नादोर जराल यांनी गत जून माहेचे ११ वे तारखेचे सरकारी पत्रात हकीकत सादर केली ती प्रतापशाली साहेब मशारानिल्हे यानी लक्षात घेऊन युक्त दिसून वर सांगितलेल्या शेऱ्यावरून जो ठराव झाला तो कायद्याचे संपूर्ण उपयोगार्थ बहाल करीत आहेत. हे आरमाराचे समुद्रापलीकडील प्रांताचे दिवाण कचेरींतून गोवेर्नादोर मशारनिल्हे याचे व स्वार्थी याचे माहितीस येण्याबद्दल निवेदन केले जात आहे. राजवाडा तारीख ११ माहे आगोस्त सन १८८३ जुलय मार्किस दे विन यथार्थ भाषांतर.

या निवाड्यांतील शेवटच्या ओळीवरून लिस्बनला दि. ११ ऑगस्ट १८८३ रोजी तो झाला असल्याचे दिसून येते. पोर्तुगालहून गोव्यापर्यंत पोचायला त्याला महिन्याहून अधिक काळ लागला व १९ सप्टेंबर रोजी सरकारी गॅझेटवर तो प्रसिध्द झाला. पण दि. ३/२/१८८२ या दिवशी श्रीस्वामीच्या अर्जावर गव्हर्नरनी जो शेरा मारला होता त्या अनुसार दि. १७ व १८ एप्रिल १८८३ रोजी काणकोणच्या मामलेदारानी मठाचे सर्व दागदागिने वगैरे श्रीपद्मनाभतीर्थ स्वामी यांच्या ताब्यात दिले होते. पोर्तुगालच्या अखेरच्या व कायमच्या निवाड्याने या सर्व प्रकरणावर कायमचा पडदा पडला व श्रीगोकर्ण पर्तगाळ मठ व श्रीरामदेव देवालय हे एक स्वतंत्र संस्थान असून, त्याचे मालक वा महाजन कुणी एक वा अनेक व्यक्ती नाहीत ही गोष्ट सिध्द झाली. श्रीस्वामी त्याचे मालक नाहीत असे या निवाड्यात म्हटलेले नसले तरी सर्व स्वामीजीची भूमिका मुळी आपण या मठाचे विश्वस्त आहोत आणि श्रीगोकर्ण पर्तगाळी संस्थान हे समाजाचे आहे अशीच आहे. सर्वसंगपरित्याग केलेले संन्यासी हे स्वतः त्यागावर जगतात, भोगावर नाही. सर्वसामान्य संसारी माणसांहून त्यांचे जीवन हे वेगळे असते, विरागी असते आणि तरीही विशिष्टपंथांच्या गुरुपदाची भूमिका त्यांच्याकडे नियतीने सोपविली असल्यामुळे आर्थिक व सामाजिक व्यवहार, शिष्यवर्गाचे मानसिक स्वास्थ, धार्मिक व नैतिक मार्गदर्शन वगैरे गोष्टी त्यास कराव्या लागतात. आणि हे सर्व पाण्यात पडलेल्या तेलाच्या थेंबाप्रमाणे पाण्यापासून अलिप्त राहून ते करतात. मठाचे मूळ संस्थापक श्रीमन्नारायणातीर्थ यांच्यापासून ही परंपरा चालत आली आहे आणि आजचे विद्यमान पीठाधीश श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीही ती चालवीत आहेत.

आतापर्यंत घडलेल्या घटना पोर्तुगालात राजेशाही असतानाच्या म्हणजे ज्या काळात हिंदूंवर राजसत्तेची कृपादृष्टी तर नव्हतीच उलट हिंदूंना सर्वच दृष्टींनी कमी लेखण्याची प्रथा होती आणि ख्रिस्ती हा राजधर्म होता त्या वेळची. इ.स. १९१० मध्ये पोर्तुगालात राज्यक्रांती होऊन लोकशाही आली आणि सुमारे वीस वर्षे ती टिकली. या काळात पोर्तुगाल हे निधर्मी राष्ट्र म्हणून घोषित झाले. हिंदूंना सर्वप्रकारे आपला उत्कर्ष घडवून आणण्याची संधी मिळाली. गोकर्ण-पर्तगाळ व कवळे या हिंदूंच्या दोन्ही गुरुपीठांना आदराने वागविण्यात येऊं लागले. सरकारकडून कोणत्याही प्रकारे उपसर्ग पोचला नाही. सन १९२६ मध्ये पोर्तुगालमध्ये प्रतिक्रांति होऊन लष्करशाही आली. १९३३ मध्ये डॉ.सालाझार हा हुकुमशहा बनला. पुन्हा एकदा ख्रिस्ती धर्म हा राजधर्म बनला. हिंदूंचा या काळात जुन्या काळाप्रमाणे छळ झाला नाही. पण हिंदु धर्माला राजकर्त्यांच्या दृष्टीने उणेपणा आला. पण सुदैवाने याही काळात हिंदूंच्या गुरुपीठांकडे सरकारची वक्रदृष्टी वळली नाही. पूर्वीचे सर्व प्रकारचे मानमरातब चालूच राहिले.

१९४६ साली गोव्याच्या नागरिक स्वातंत्र्याची व नंतर गोवा मुक्तिलढ्याची चळवळ सुरू झाली.

१९५३ साली पोर्तुगालचे सागरोत्तर प्रदेशाचे मंत्री मानुएल मारीय सार्मेतु रुद्रीगीश हे गोव्याला आले. त्यावेळी त्यांनी पर्तगाळ मठाला भेट देऊन श्रीस्वामी व्दारकानाथतीर्थ यांचे दर्शन घेतले होते. मंत्रीमहाशयांचा मुक्काम गोव्याला असतांना गोकर्ण-पर्तगाळ व कवळे मठाकडून मठांच्या कायदेशीर व्यक्तिमत्वाबाबत त्याचप्रमाणे मठांना स्वतंत्रपणे मान्यता मिळून त्यांना कांही खास सवलती मिळाव्या अशी मागणीपत्रे गेली असावी. कारण मंत्रीमहाशय पोर्तुगालला परत गेल्यावर दि. २३/१/१९५४ रोजी लिस्बनहून जी एक डिक्री (decreto) काढली त्यांत त्याचा उल्लेख आढळतो. ही डिक्री या ठिकाणी संपूर्णपणे उद्धृत करतो:-

Ministerio do Ultramar

Direcao do Administracao politica e civil - decreto no 39.518

Atendendo ao que por representado

pelos Suamis de Partagale e de Queula, no Estado da India a quem O Governo Portugues ja' Concedia as prorogativas mencionadas no artigo

8; do Decreto no. 35-915, de 24 Outubro de 1846.

Ouvido o conselho ultramarino, e usando a faculdade conferido pelo no. 3. do art. 15 da constituicao, o ministro do ultramar decreta e em promulgo o seguite:-

Art. no 1. - No territorio Portugues do Estado da India e' reconhecida personaliadade juridica as instituicoes religiosas do culto hindu denominados mathas, compentido a representacao e administracao de cada uma delas ar respectivo suami. sendo as normas tradicionais do respectivo culto.

Artigo 2 - E' concetdida inrsencao de quais quer taxas e direitos aduaneiros nas importacones de imagens sagradas, insignias e outros objetos destinados exclusivamentes a' pratica do culto hindu.

Publique se e cumpre - se como nele se contem pacos do Governor da Republica, 23 de Janeiro de 1954 (as) Francisco Higino Craveiro Lopes Antonio Oliveira Salazar Manuel Maria Sarmento Rodrigues

Para Publicudo no Botetim Official do Estado da India (a) Manuel Maria Sarmento Rodrigues Diariodo Governo - I serrir no. 15 de 23/1/54 Boletim Official no. 14, I Serie de 8/9/1954.

वरील डिक्रीचा सारांश असा:-

पर्तगाळ व कवळे येथील स्वामींच्या मागणीनुसार दि. २४/१०/१९४६ च्या डिक्रीतील आठव्या कलमात असलेल्या सवलती व हक्क यापूर्वीच दिलेले आहेत. सागरोत्तर प्रदेश मंत्री सार्मेतु रुद्रीगिश राष्ट्राध्यक्ष डॉ. सालाझार व गव्हर्नर जनरल क्राव्हेयर लॉपिश हे या डिक्रीने पुढील गोष्टी ठरवीत आहेत.

१) मठ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या हिंदूंच्या धार्मिक संस्थांचे कायदेशीर व्यक्तिमत्व मान्य करण्यात येत असून त्याच्या स्वामींना पूर्वपरंपरेनुसार व धर्मानुसार मठाचा कारभार करण्याचा हक्कही मान्य करण्यात येत आहे.

२) देवमूर्ती, धर्मचिन्हे वा प्रतीके किंवा हिंदू धर्मात वापरण्यात येणाऱ्या इतर वस्तू आणल्यास त्यास जकातीचा वा इतर कर माफ करण्यात येत आहे.

**नंतरच्या सवलती**- यानंतर पाच वर्षानी दि. १९ नोव्हेंबर १९५९ ची एक डिक्री दि. ३/१२/१९५९ च्या सरकारी गॅझेटवर प्रसिध्द केली. आणि त्यात कोंफ्रारी,

देवालये, मठ आणि मशिदी यांच्या जमिनीस जर त्यांचे उत्पन्न धर्मकृत्यासाठी खर्च होत असले तर त्यास जमीन महसूल माफ करण्याची व्यवस्था केली.

१० नोव्हेंबर १९६० रोजी पोलीस अधिकाऱ्यांच्या नावे पत्र पाठवून पर्तगाळ मठाच्या आदरणीय स्वामींना गोव्यात प्रवेश करतेवेळी पोळे नाक्यावर सर्व प्रकारच्या सवलती (todas as facilidades a sua Excia Reverendessmo o swami de partagale) दिल्या असल्याचे कळविले.

दि. २७ नोव्हेंबर १९६० च्या पत्राने गोव्याच्या आरोग्य खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी पर्तगाळ मठाच्या सेक्रेटरीना पत्र पाठवून पर्तगाळ व कवळे मठाच्या स्वामींना गोव्यात येताना किंवा त्यांचा मुक्काम गोव्याला असतांना त्यास कोणत्याच प्रकारचे इनॉक्युलेशन करु नये असा आरोग्य खात्याच्या कर्मचाऱ्यास आदेश दिला असल्याचे कळविले.

❀❀

**पर्तगाळ येथील श्रीमुख्यप्राण घुड्डाच्या पायऱ्यांच्या डाव्या बाजूच्या भिंतीत बसविलेल्या शिलालेखाचा यथा उतारा**

**(शिलाफलकांची आकृति ३२ सें. मि. X ३२ सें. मि.)**

**।। श्रीमुख्यप्राण प्रसन्न ।।**

श्रीशके १७३३ प्रजापति नाम संवत्सरे चैत्र शुक्ल ५ म्यां शुक्रे
श्रीमदानंदतीर्थ श्रीपाद स्वाम्यनुज्ञया
नागेंद्र कामति वैदिक पणजे याणि
श्रीचा स्तंभ जीर्णोद्धार करून प्राणप्रतिष्ठा केलेचा शके
यजमानाय मंगलानि ददातु. (1811 A.D.)

# सर्वशास्त्रभिज्ञ प्रकाशवंत

श्री गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या स्वामी परंपरेत काही स्वामीनी आपली तपसाधना आणि विद्वता यामुळे इतके दैदीप्यमान बनले की त्यांचे श्रीमठाच्या व्यवहारात आणि सण उत्सवादि कार्यक्रमप्रसंगी वरचेवर स्मरण केले जाते. श्रीमठाचे संस्थापक श्रीमत् नारायणतीर्थ स्वामीजींचा उल्लेख अपरिहार्यपणे परंपरेचे उद्गाते या नात्याने होत असतो. त्यांची साधना, संघटनशक्ति किंवा बुध्दिमत्ता कमी होती अशांतला भाग नाही. पण एक नव्या मठाची स्थापना हेच एवढे महान् कार्य होते की त्यापुढे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे व कार्याचे इतर अनेक पैलू झांकोळले गेले. गोवाच काय, भारतहि स्वतंत्र होण्यापूर्वी ज्यांनी मठाची धुरा प्रदीर्घ कालपर्यंत चालवून आपल्या तेजस्वितेने, सुधारणेच्या मार्गावरील साऱ्या समाजाला सुयोग्य मार्गदर्शन केले ते श्रीमत् इंदिराकांततीर्थ स्वामीजी हेहि या परंपरेतील एका तेजस्वी ताऱ्यासारखे आहेत.त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेऊन स्थित्यंतराच्या बिंदूवरील समाजाला त्यांनी किती कुशलतेने मार्गदर्शन केले आणि समाज व मठ यांच्यात निर्माण होऊ शकणारी संभाव्य फारकत कशी टाळली हे प्रत्यक्ष पाहिलेले लोक आजहि गोव्यात व गोव्याबाहेर हयात आहेत. त्यामुळे त्यांचे पुण्यस्मरणहि ओघानेच होत असते. श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामीजींनी स्वातंत्र्योत्तर भारतात व मुक्त गोव्यातहि समाजाचे आध्यात्मिक नेतृत्व समर्थपणे केले. तो सर्व अगदी अलीकडचा इतिहास आहे. परंतु श्रीमद् नारायणतीर्थापासून श्रीमद् इंदिराकांत-श्रीद्वारकानाथतीर्थापर्यंतच्या परंपरेत एक आगळ्या तेजाचा हिरा म्हणून पूर्णप्रज्ञतीर्थ श्रीपाद वडेर होत. त्यांच्या वृन्दावन प्रवेशाचा १२५ वा स्मृतिदिन आज (२१ मे २००४) पर्तगाळी मठांत वैभवाने साजरा होत आहे.

झपाट्याने बदलणाऱ्या आजच्या युगात वर्तमान काळ देखील हळूहळू कालबाह्य होऊ लागला आहे. तत्कालीन महत्वाच्या गोष्टी आणि व्यक्ति व विभूती एका दशकाच्या आतच विस्मृतीच्या खोल गर्तेत पडून दडल्या जातात. कोणीतरी मुद्दाम इतिहासाच्या दफ्तराचें बाड उघडून त्यांची माहिती जगाला द्यावी लागते आणि त्यांत असामान्य कांही नसेल तर आजचें जग अशा इतिहास संशोधनाची विशेष दखल घेण्यासहि तयार होत नसते. अशा युगांत एका संन्याशाचें स्मरण त्यांच्या निर्वाणानंतर सव्वाशें वर्षानी समाजाने कृतज्ञपणें करावें यांतच त्या विभूतीची महती स्पष्ट होणारी

आहे. अर्थातच त्यांच्या जीवनकार्याचे मूल्यमापन आजच्या मापाने करणें योग्य होणार नाही. ज्या शतकांत ते वावरले त्या शतकांतील देशाची एकंदर परिस्थिती कशी होती, त्यांतहि हिन्दु समाजाची वृत्ति लक्षांत घेऊन श्रीमत् पूर्णप्रज्ञ तीर्थाच्या कार्याचें मूल्यमापन केले तर निर्विवादपणे असा निष्कर्ष निघतो कीं त्या स्वामीजींची दृष्टि भविष्यकालाकडे होती. पीठाधीश या नात्याने मठाची सूत्रे हाती घेऊन समाजाचे आध्यात्मिक नेतृत्व करण्यासाठी आपली वैदिक साधना परिपक्व झाली पाहिजे याची जाणीव त्यांना आरंभापासून होती.

कर्नाटकांतील मुडगेरी या गावांत शके १७३१ मध्ये भाद्रपद शु. चतुर्थीला त्यांचा जन्म झाला. श्री गजाननाच्या जयंतीदिनी जन्मलेल्या या मुलाचे नांवहि गणेश ठेवण्यात आले. एक हुशार व चुणचुणीत मुलगा म्हणून गणेश ओळखला जात असे. वयाच्या १५ व्या वर्षी म्हणजे शके १७४६ मध्ये चैत्र पौर्णिमेला त्यांना आश्रम दीक्षा देण्यात आली. घरंदाज घराण्यातील त्या हुशार विद्यार्थ्याने संन्यासाश्रमांत प्रवेश करताच विद्याभ्यास चालू ठेवला. श्रीमध्वाचार्यांच्या सिध्दांताचेच आपणास आचरण करावे लागणार आणि समाजाला ते सिध्दांत पटवून त्यांचे अनुकरण करण्यास प्रवृत्त करावें लागणार या जाणीवेतून त्यानी सर्वप्रथम श्रीमध्वसिंध्दांत आत्मसात करण्याचा दृढ संकल्प केला आणि बालवयांतच श्रीमध्वाचार्याच्या ब्रह्मसूत्रभाष्याचे भक्तिभावे अध्ययन सुरू केले. मग श्रीमदानंदतीर्थ भगवत्पादाचार्य प्रणीत ब्रह्मसूत्रभाष्य तथा श्रीन्याय सुधाचा चिकित्सक बुध्दीने तौलनिक अभ्यासहि केला. पण ज्ञानार्जनाची इतर साधने व दालने उपेक्षित ठेवली नाहीत. प्रमूख सूत्रे, सूक्ते, शास्त्रे, वेदवेदांत, न्याय, आदींचा सखोल व परिपूर्ण अभ्यास केल्यानंतर समाजाला मार्गदर्शन करण्याची शक्ति आपणास प्राप्त झाली असा आत्मविश्वास जेव्हा त्याना निर्माण झाला तेव्हाच ते समाजाला सामोरे गेले. अनेक जिज्ञासूचे त्यानी समाधान केले. प्रापंचिक तापांत सांपडलेल्या अनेकांना आपल्या उपदेशाद्वारे दिलासा मिळवून दिला. श्रीमठाच्या विविध कार्याना शिस्तबध्द दिशा घालून दिली आणि अनेक विद्वत्सभांमध्ये संचार करून आपल्या बुध्दिमत्तेचा प्रभावी ठसा उमटविला.

ज्ञानार्जनाचे मुख्य साधन म्हणजे देशाटन होय असे ते मानीत. कारण देशाटनामुळे देशाच्या विविध भागात इतस्ततः विखुरलेल्या शिष्यपरिवाराशी संपर्क येऊन त्यांचे जीवन व प्रश्न यांची प्रत्यक्ष माहिती मिळते त्याचप्रमाणे इतिहास, भूगोल, राजकारण,

अर्थकारण व समाजकारणाचे ज्ञान प्राप्त होते असे ते मानीत. या दृष्टीने प्रवासाची कोणतीच साधने आणि मुक्कामाच्या ठिकाणी पुरेशा सोयी उपलब्ध नसतांना देखील त्यांनी केलेल्या यात्रांचे वृत्तांत वाचून अचंबा वाटतो. श्रीस्वामीनी काही काळ तीर्थयात्रेत घालविला. एका तीर्थयात्रेत त्यांनी जवळजवळ संपूर्ण भारतभ्रमण केले. या भ्रमणास त्यांना तीन वर्षे लागली. शके १८८२ साली त्यांनी तीर्थयात्रेस प्रारंभ केला. परत येताना शके १७८४ च्या मार्गशीर्ष मासात ते पुण्याला होते असे दप्तरातील कागदपत्रात नमूद आहे. प्रथम त्यांनी दक्षिण भारताची यात्रा केली. पुढे ते उत्तरयात्रेला गेले प्रथम कोल्हापूरला जाऊन त्यांनी माता अंबाबाईचे दर्शन घेतले. कोल्हापुर हे त्यावेळी स्वतंत्र संस्थान होते. त्या ठिकाणी महाराजांचे गुरु श्री रावजी महाराज यांनी राजेसाहेबांच्या वतीनें श्री गोकर्ण पर्तगाळी मठाधीशांचे यथोचित भव्य स्वागत केले. स्वामीजींनी कोल्हापूर वास्तव्यांत श्रीमहालक्ष्मी देवीचे पूजन करून नासिक क्षेत्राच्या दिशेने प्रयाण केले. वाटेंत लहान मोठ्या सर्व तीर्थक्षेत्रांना त्यांनी आग्रहाने भेट दिली. नाशिकवरून ते प्रयाग क्षेत्री गेले. तिथे संगमावर स्नान करून तसेच काशीक्षेत्री जाऊन गोकर्ण-पर्तगाळ संस्थानच्या उपमठात निवास केला. या मुक्कामात त्रिवेणीस्नान म्हणजे गंगेत त्रिकाळ स्नान करण्याची त्यांची पध्दत होती.

मठांत दैनंदिन बारा ब्राह्मणांना स्थायी स्वरूपाचे संतर्पण व्हावे यासाठी खास वृत्तीची स्थापना करण्यात आली. अनेक विद्वान पंडितांशी धर्मशास्त्र व अध्यात्मावर विचार विनिमय केला आणि भागीरथीत त्रिकाल स्नाने केली व सहस्र ब्राह्मणसंतर्पण केले. श्रीमद् पूर्णप्रज्ञ तीर्थाचा काशी मुक्काम त्याकाळी बराच गाजला. स्वामीजींच्या दर्शनासाठी व त्यांच्या विचारांच्या श्रवणासाठी अनेक श्रध्दाळु लोकाप्रमाणेंच त्या क्षेत्रांतील आचार्य व अन्य विद्वान मंडळीहि नियमितपणे येत असत. त्यांचे सखोल ज्ञान, विचारांची परिपक्वता, निस्पृह वृत्ति आणि उदार दातृत्व पाहून काशी क्षेत्रातील पंडितवर्ग प्रभावित झाले.

काशीच्या समस्त पंडीत व आचार्यवृंदाने आचार्यांचा अध्यात्मविद्या व वेदवेदांतादि शास्त्रे यांच्यातील अधिकार जाणून मानपत्र दिले. (या मानपत्राची प्रत संस्थानच्या दप्तरात उपलब्ध आहे.) काशीच्या प्रातिनिधिक अशा पंधरा पंडितांच्या सह्यानी श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांना दिलेले मानपत्र. त्याना खास विद्यापीठांतील सभेत सन्मानपुरस्सर अभिवादन करून दिले असे त्यांत म्हटले आहे. हे मानपत्र देण्यापूर्वी या सर्व

पंडितानी आचार्यांशी सकल शास्त्रांवर चर्चा केली होती. त्या वेळी श्रीं नी जो शास्त्रनिर्णय दिला त्यावरून आचार्यांचे 'सर्व शास्त्रांवर प्राविण्य आहे'' असे त्यांच्या अनुभवास आले होते असेही या मानपत्रात नमूद करण्यात आले आहे. (परिशिष्ट पहा)

पुण्यांतील मुक्कामात तेथील पंडितानी श्रीपूर्णप्रज्ञतीर्थस्वामींना जे मानपत्र दिले त्यांत या काशीच्या पंडितानी दिलेल्या मानपत्राचा उल्लेख केलेला आहे. हे मानपत्र पुणे येथे शके १७८४ मार्गशीर्ष शुध्द १३ ला देण्यात आले असून त्याखाली करहाट क्षेत्र, वैराज क्षेत्र, संगमेश्वर, गंगाखेड, नासिक वगैरे ठिकाणच्या पंडितांच्या संमतीदाखल सह्या आहेत. (परिशिष्टात पहा)

श्री पूर्णप्रज्ञतीर्थ स्वामी या यात्रेहून परत आल्यावर अध्यापन व साधना यांतच ते काळ व्यतीत करू लागले. श्रीशैल (तिरुपति) यात्रेस जाऊन व्यंकटगिरीवर केलेले वराहार्चन आणि श्रीव्यंकटेशास दररोजी नवनीत कर्पूर मंगलार्ती होण्यासाठी शाश्वत निधि अर्पण केला. ही एक संस्मरणीय यात्राच होती. कांचीक्षेत्रात वरदराज व सेतुमाधवाचे दर्शन घेऊन त्यांनी आपल्या पहिल्या यात्रेची सांगता केली आणि मग स्वमठासाठी वेळ देतां यावा म्हणून श्रीपर्तगाळी मठात परतून आपले शिष्य श्रीमद् पद्मनाभतीर्थ यांना ग्रांथिक व अनुभवसिध्द विद्यादानाचे कार्य हाती घेतले. हे देखील एका विशिष्ट क्रमाने व शिस्तीने ते करीत. प्रत्येक पौर्णिमेस श्रीमद्भागवत पारायणाची एक आवृत्ती पूर्ण करून संतर्पण केले आहे.

श्रीमठांत परतल्यावर पुन्हा विद्यादानाचे सत्र सुरू झाले. श्रीमत् न्याय सुधाचे पाठ क्रमशः पाठशाळेतील विद्यार्थ्यांना व आपल्या शिष्याना देऊ लागले. दूरवरचे प्रदेश पाहून आल्यावर आता जवळच्या प्रदेशांकडे थोडे अधिक लक्ष देण्यासाठी स्वामीजींना उसंत मिळू लागली. खुद्द काणकोण महालांतील अनेक भागांमध्ये संचार करून स्वामीजींनी समाजाच्या प्रश्नाकडे जातीने लक्ष घातले. या संचारांत श्रीशके १७९९ मध्ये पैगीण येथील श्रीपरशुराम देवालयात स्वामीजींनी आयोजित केलेले सहस्रब्राह्मण संतर्पण ही तत्कालीन महत्वाची घटना होय. माशे येथील श्रीनिराकार देवालयात श्री शके १७६२ मध्ये मुक्कामात असताना देवालयाच्या मागच्या बाजूला असलेल्या खाडीवर स्वामीजीनी पूल बांधून घेतला. पैंगीण व पर्तगाळी यांना जोडणारी 'पाज' श्री. शंकर प्रभु बोरुसकर यांच्याकडून बांधून

घेऊन अगदी जवळ असूनहि डोंगरामुळे अलग पडलेली ही दोन गावे एकत्र जोडून दिली. नव्या रस्त्यामुळे या 'पाजे'ला महत्व उरलेले नसले तरी स्वामीजींच्या समाजोन्मुखतेची साक्ष देत अनेक दशके ती उभी आहे. शके १७९१ मध्ये स्वामीजीनी पैंगीण येथे श्रीनारायण देवालयाजवळ नदीवर आणखी एक पूल बांधून घेतला. पूल हे माणसांची हृदये जोडणारे दुवे आहेत असे स्वामीजी मानीत. परस्पर संपर्क आणि परिचयाव्दारेच स्नेह व सहकार्याची वृध्दि होऊं शकते.. हा संदेश आचरणासाठी स्वामीजींनी हे पूल बांधले.

वेदान्त ही भारतीय संस्कृतीची अखिल जगाला एक अपूर्व अशी देणगी आहे. वेदान्त ही एकदा जीवनाची बैठक बनली की माणूस षड्विकारांपासून तर मुक्त होतोच शिवाय तो निर्ममी बनतो. स्वामीजींनी अभ्यासलेले वेदान्ताचे तत्वज्ञान त्यांच्या जीवनाशी व अंगिकृत कार्याशी एवढे एकरूपता पावले की गुरुदक्षिणा व अन्य मार्गांनी हाती आलेले धन स्वामीजींनी मुक्तपणे देव, देश व समाजकार्यार्थ वेंचलें. स्वामीजींच्या दातृत्वाचा कीर्तिसुगंध आजहि दरवळत आहे तो त्यांच्या निरिच्छ भावनेने केलेल्या दानधर्मामुळे! मंजेश्वर येथे गेल्या वेळी स्वामीजींनी तेथील श्रीमदनंतेश्वरास साठ तोळे सोने अर्पण केले याबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठी देवस्थानच्या महाजनांनी मध्वनवमीला सुरू केलेला उत्सव आजतागायत चालू आहे. कुमठा येथील श्रीवेंकटरमण देवस्थानात माघ शु. ९ मीला होणारा स्वामीजीचा रथोत्सव, त्या देवस्थानातील परंपरेने चालत आलेल्या प्रतिवार्षिक रथोत्सवापेक्षा कितीतरी प्रचंड असतो श्रीरामनाथ देवस्थानी ५०० रुपये ठेवून त्याच्या व्याजातून अक्षय तृतीयेला पालखी उत्सवाची योजना स्वामीजींनी केली. स्वामीजी जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी धर्मकार्याची, देवकार्याची, उत्सवाची तरतूद करून ठेवली. स्वामीजींना श्रीमठाच्या संपत्तीत भर घालणे प्रशस्त वाटले नाही आणि म्हणूनच स्वामीजी हाती येईल त्या धनाचा विमुक्तपणे दान करीत राहिले. दक्षिण कन्नडांत उप्पीनंगडी येथे श्री व्यंकटरमण देवस्थानी स्वामीजींनी श्रीमूर्तीची प्रतिष्ठापना केली. तेथे स्वामीजींना वायुदेवाचा अवतार मानले जाते आणि म्हणूनच तेथील मुख्य प्राणाच्या मूर्तीच्या पार्श्वभागी श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ स्वामीजींचे पूर्णाकारी तैलचित्र लावण्यात आलेले असून आजहि त्यांना आरती दाखविली जाते.

प्राचीन धार्मिक व शास्त्र ग्रंथ शुध्द रूपांत पुढच्या पिढीला मिळावे यासाठी

स्वामीजींनी अनेक ग्रंथांच्या स्वतःच्या हाताने लिहून प्रती तयार केल्या. प्राचीन ग्रंथांच्या या सर्व नकला आज श्रीपर्तगाळी मठांत पहावयास सांपडतात. ज्ञानसाधनेमुळे येणाऱ्या आत्मसंतुष्टतेचा स्पर्श स्वामीजीनी आपणास होऊन दिला नाही. ज्ञान हे दानाने वाढते, संग्रहाने घटते हे ओळखूनच स्वामीजींनी ज्ञानदानाचे कार्य अखेरपर्यंत चालू ठेवले.

श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या दफ्तरांत श्रीमद्पूर्णप्रज्ञतीर्थ स्वामीजींना मिळालेली मानपत्रे, त्यांनी केलेल्या यात्रा, त्यांच्या उद्बोधक विचारांचे नवनीत मानतां येईल असे अन्य कागदपत्र एखाद्या भाविक इतिहास संशोधकाची वाट पहात आहेत. या सर्व कागदपत्राचे नीट संकलन केले तर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक व राजकीय इतिहासावर नवा प्रकाश पडू शकेल. श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ स्वामीजींच्या वृन्दावन प्रवेशाचा आज सपाद शतमानस दिला आहे. आजच्या या पुण्यदिनी (दिनांक २१.५.२००४) त्यांचे भक्तिपूर्वक स्मरण करून श्रीमठाच्या वैभवशाली इतिहासाच्या एका समर्थ घडवय्याकडे समाजाचे लक्ष तेवढे वेधीत आहे.

## श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजींचा
## यंदाचा चातुर्मास पंढरपुरीं

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी तारणनाम संवत्सर श्रीशके १९२६ मधील चातुर्मास सुविख्यात पुण्यतीर्थ पंढरपुर येथे श्रीविठ्ठलाच्या सान्निर्धीत चंद्रभागा (भीमारथी) तीर्थ किनारी आचरणार आहेत. गतवर्षी यल्लापूर येथील चातुर्मासव्रत समाप्तीच्या दिवशीं त्यांनी तसा संकल्प जाहीर केला होता. श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी मठ परंपरेंतील दुसरे गुरुस्वामी श्रीवासुदेवतीर्थ यांनी तीर्थाटन चालू असताना पंढरपुर क्षेत्रात मोक्ष प्राप्त केला होता. गुरु-ऋणाचें स्मरण ठेऊन यंदाच्या चातुर्मासासाठी प.पू. श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी यंदाच्या चार्तुर्मासासाठी पंढरपुर क्षेत्राची निवड केली आहे.

# गुंड व दरोडेखोरांचा उपसर्ग

पर्तगाळी मठाचे मुख्यालय गोव्याच्या काणकोण तालुक्यांत असून मठस्थापनेच्या वेळीं हे स्थळ सोंदेकरांच्या राज्यांत समाविष्ट होते. इ. स. १५१० साली तिसवाडी बेटांवर कब्जा केल्यानंतर गोमंत प्रदेशाचा शेष थोडासा प्रदेश पोर्तुगीजांनी अनेकदां काबीज केला व त्यांच्या हातून तो निसटलाहि. शेवटी इ. स. १५४३ पर्यंत तिसवाडी शिवाय बार्देश व सासष्टी हे दोन तालुके पोर्तुगीजांच्या ताब्यांत गेले. (आजचा मुरगांव तालुका त्यावेळी सासष्टी तालुक्याचा भाग होता) नौकानयनांत प्रवीण असलेल्या फिरंगी राज्यकर्त्यांचें नौदळ बलवान असल्याने किनारी भागांतील या चार तालुक्यांवर व त्यांच्या कक्षेंत येणाऱ्या सागरी तथा अन्य जलमार्गांवर पोर्तुगीज सत्तेचे संपूर्ण नियंत्रण प्रस्थापित झाले. आणि एका हातांत क्रूस व दुसऱ्या हातांत बंदूक घेऊन बाटाबाटवीचें सत्र जेव्हा त्यांनी सुरू केले, धर्मांतरास प्रतिकार करणाऱ्यांना अमानुष सजा देण्यात सुरुवात केली त्यावेळी सारस्वतांनी आपलीं देवमंदिरे व कुटुंबांचे सुरक्षित ठिकाणीं स्थलांतर केले.

त्या काळांत पर्तगाळी येथे मठवास्तु उभी झाली नव्हती. तरी श्रीगोकर्ण मठ हे गौड सारस्वत ब्राह्मण समाजांतील वैष्णव संप्रदायाचे आद्यपीठ असल्याने मठाधीश गोव्यातील अत्याचार व जुलमांवर नजर ठेवून होते. आपल्या अधिकारांचा वापर करून परिसरांतील हिंदु राजसत्तांच्या मध्यस्थीने विस्थापित सारस्वतांना आसरा व सुरक्षा मिळवून देण्याचें काम त्यांना मोठ्या प्रमाणांत करावे लागले. गोमंत मातेच्या गळ्यांतील मोत्यांचा हार मानवताद्रोही क्रूर शत्रूने धपक्यांत तोडून त्यांतील मोती दूरवर फेकून द्यावे व ते इतस्ततः विखरावे अशी ती अवस्था होती. तरी देखील सौंदेकर राजांच्या सतर्कतेमुळें पोर्तुगीज मुलखांतील प्रमुख आद्य मंदिरें अंत्रुज महालांत नव्याने आकार घेऊं लागली आणि पर्तगाळी मठाला देखील एक प्रकारचे सरकारी संरक्षण मिळत राहिले.

सौंदेकर राजघराण्याचे पर्तगाळ मठाकडील संबंध अत्यंत मैत्रीपूर्ण होते. राजघराण्याचे सदस्य वरचेवर श्रीदेवगुरु दर्शनासाठी पर्तगाळी मठांत यायचे. त्यामुळे मठांत एक प्रकारची सुरक्षिततेची भावना होती आणि करमल घाट ओलांडून गुरुसान्निध्यांत चार दिवस निवांत सारण्यासाठी येणाऱ्या यात्रिकांची वर्दळहि चालू असायची. पण १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात (1762-44 A.D.) जेव्हा

मुसलमानी आक्रमणापुढें नमते घेऊन सौंदेकर राजाना पोर्तुगीजांचा आश्रय घ्यावा लागला तेव्हा परिस्थिती बदलली. युध्द हरतां हरतां त्यांनी पोर्तुगीजांशी जो तहनामा केला त्यांत आपल्या राज्यांतील हिंदू समाजाला धर्मस्वातंत्र्य दिले जाईल व त्यांच्या प्रथा-परंपरा अबाधित ठेवल्या जातील असे कलम दाखल करून घेतले. अशाच प्रकारचा दुसरा करार मराठ्यांनी पोर्तुगीजांशीं केला होता. त्यावेळी गोव्यांतील बाटाबाटवीचे सत्र संपलेले असल्याने शेष तालुक्यातील हिंदु समाज धर्मस्वातंत्र्य उपभोगू लागला होता. कळतें पण वळत नाही म्हणतात त्या न्यायाने आगळिकांचे किरकोळ प्रकार घडून एक दोन देवमंदिरांची विटंबना करण्याचे पोर्तुगीजांनी प्रयत्न केले. पण समाजाने आवाज उठविताच त्या गोष्टीचा आळा बसला. एक गोष्ट घडत राहिली, किनारी भागांतील तीन तालुक्यांचा मोठ्या प्रमाणांत विकास होत राहिला. इतर तालुक्यांतील भाग उपेक्षित राहिला.

पोर्तुगीज सरकारने नव्याने काबीज केलेल्या प्रदेशाकडे दुर्लक्ष करण्याचे कारण म्हणजे त्या भागांना ख्रिस्ती धर्माचा स्पर्श झाला नव्हता. आपण ख्रिस्ताच्या अनुयायांचे संरक्षक आहोत, गांवढळ लोकांचे वा त्यांच्या दैवतांचे रक्षण करणे हे आपलें काम नव्हे असें ते मानत. त्यामुळे पोर्तुगीज पोलीस व सैन्याच्या चौक्या प्रामुख्याने किनारी भागांपुरत्या मर्यादित होत्या. उर्वरीत प्रदेशांत एखाद्या स्थानिक माणसाची रेजिदोर म्हणून नेमणूक करण्यांत यायची आणि नव्याने बाटून ख्रिस्ती झालेल्यापैकीं जे कोणी नव्या काबिजादींत स्थायिक झालेले असतील त्यांच्याकडे करवसुली, शासनव्यवस्था आणि दंडाधिकार देखील दिलेले असायचे. त्या काळांत असामाजिक शक्तींनी संघटित होऊन नव्या काबिजादींतील श्रीमंत घरांवर व देवळांवर दरोडे घालून मिळेल ती वस्तु लुटून नेण्याची व प्रतिकार करणाऱ्यांवर गोळी झाडून त्याचा कांटा काढण्याची एक मोहीम सुरू केली.

एकीकडे सत्तरीच्या राण्यांचा उठाव चालू होता आणि तेही आपल्या दळांतील लोकांना रसद व अन्य मदत उपलब्ध करून देण्यासाठी कधी याचना करून कधीं दडावून, कधी धाक घालून आणि कित्येक प्रसंगी लुटून देखील संपत्ती गोळा करीत. त्यांतहि जुन्या काबिजादींत सशस्त्र पोर्तुगीज पोलिस व सैनिक मोठ्या संख्येने तैनात असून तेथील संरक्षक तट भेदणे अवघड असल्याने त्यांचें खंडणी वसुलीचे क्षेत्रहि नव्या काबिजादी पुरतें मर्यादित होते. राण्याच्या बंडाला स्वातंत्र्य चळवळीचा मान

कांही लोक देतात हे पाहून अनेक गुंडांनी व पुंडानी गांवोगांवी टोळकीं जमवून दरोडे घालण्याचा धंदाच सुरू केला. गावोगावी जेथे जेथे सुबत्ता किंवा समृध्दीचा वास येईल तेथे तेथे ही टोळकी दरोडे घालीत आणि लुटलेला माल घेऊन रानांत दूर जात. बहुधा रात्रीच्या काळखांत असे दरोडे घातले जात. पंधरा वीस जणांचे टोळके संपूर्ण वस्तीत गराडा घालून बंदुकीच्या धाकावर घरांतील चीजवस्तू उचलून नेत. प्रतिकार करणाऱ्यास ठोसा अथवा धारदार शस्त्राचा वार आणि प्रसंगी बंदुकीची गोळी झेलावी लागायची. असे लोक तोंडावर बुरखा पांघरून यायचे यामुळे पाहणाऱ्यांना त्यांची ओळख सहसा पटत नव्हती.

## एक ऐतिहासिक नोंद

**विषयः** पैंगीण ग्रामाचा कुळकर्णी भीम शेषया याने मठाच्या स्थावर जबाबित सरकार आज्ञेप्रमाणे करण्यास मठांत गेल्यावेळी श्रीपादस्वामी यांनी दिलेलें उत्तर आणि बंडवाले यांनी श्रीरामदेवाच्या अर्चकास ताडण करून पर्तगाळीतील १५ जणांच्या घरातील दागदागिने वस्त्र-पात्र व पैसा याची लुटालूट करून नेल्याबद्दलची माहिती अय्या मजकुराने जुन्या भाषेंत मोडी लिपीत लिहिलेली असून त्यातील मुख्य भाग.

नोंदीत गुरुवर्यांची नांवे नाहीत, पण ते म्हणजे श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थ व व्दितीय गुरुवर्य म्हणजे श्रीपद्मनाभतीर्थ होय असें इतर कागदपत्रांवरून ठरते. शिवाय श्रीमदिंदिराकांततीर्थ स्वामीस श्रीशके १८०८ व्ययनाम संवत्सर वैशाख शु. १० मी - ता. १३ मे १८८६ दिवशी संन्यासाश्रम देण्यात आला, आणि श्रीमत् पद्मनाभ तीर्थ स्वामी शके १८१४ नंदन ना. स. आषाढ शु. ७ मी शुक्रवारी वृंदावनस्थ झाले - सन. १८९२.

नंतर तो जबाबिता झाला की नाही समजेना. पण मठ हें श्रीरामदेवाचें आलय असल्याने कोडाप्रमाणे त्या आलयाचा वहिवाट पाहण्यांस कमिटी स्थापन केली आणि मामलेदार मठांत येऊन कमिटीकडे मठाच्या व्यवहाराचा ताबा दिला आणि त्याचप्रमाणे इतर देवालयांचाहि व्यवहाराचा ताबा त्या त्या कमिट्यांकडे सन १८८१ सालांत दिला.

मठाच्या संपत्तीचा अधिकार फक्त श्रीस्वामीचा असल्याबद्दलचा तक्रार अर्ज पोर्तुगीज सरकारास श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थ स्वामीनी केला होता, त्यास सरकार मान्यता मिळाल्याने कमिटी बडतर्फ करून त्यावेळी मठाधीश श्रीमत्पद्मनाभतीर्थ परंपरेचे १९ वे स्वामी महाराज असल्याने, मामलेदार याने मठात येऊन, मठाच्या संपत्तीचा ताबा, परत श्रीस्वामी महाराजांकडे दिला.

दि. १७ जानेवारी सन १८७१ रोजी रात्रीं, गोव्यांतील सत्तरी (सातारी) प्रांतांतील राणे यानी गोव्यांत बंडाळी करून पर्तगाळी मठाभोंवती राहणाऱ्या लोकांच्या घरांतील सामानांची लुटालूट केली, आणि श्रीराम देवाचा पुजारी यास, मठाचे भांडार कोठे आहे ते दाखवण्यासाठी दिलेले त्रास याची माहिती पैगीण ग्रामाचा आदरमिनिस्त्रातीव कुळकर्णी भीम शेषया, कऱ्हाडी ब्राह्मण, जन्मस्थान शेळी, लोलयें, निवासी मागदाल, ग्राम पैंगीण याने सरकार आज्ञेप्रमाणे लिहून पाठविला त्यांतील उतारे:-

> "**शहामत पन्हा साहेब** - मी खाली सही केलेचा कुलकर्णी आदमिनीस्त्रातील, मौजे पैंगीण, प्रांत काणकोण, हे बखैरीवरून विदीत करीत असे कीं - काल रोजीं मोहीबाचे मक्था आज्ञेप्रमाणे मौजेमजकुरी पर्तगाळी येथे त्रिसंध्याकाळी पोचता बंडावले यांनी चालंत माहेचे १७ वां तारखेस मठांतील व मठाबाहेर नजीकची गृहें रात्र भागी ७ वरांचे सुमारास येऊन ज्यांची ग्रही नागविर्ली ते आदमी येथ पर्तगाळी मुक्कामी हजर नसलेवरून त्यांस आज मिती मजकुरी आणवून त्या कडां विचारतां त्यानी आपली जिनगी प्रकर्णीक रात्रीस ७ वरांचे सुमारास बंडवाले मजकुर येऊन बहूत दंगा करून कांही ग्रहमजकुरांची व्दारें व ग्रहांतील पेटा वगैरे फोडून बहूत जणास ताडण करून जिंदगी बहूत न्हेली म्हणायाचें त्याणीं सांगितले प्रमाणे पेटा वगैरे फोडलेचे स्वनजरेनें प्रत्यक्ष जाहलेबरहुकूम त्याचा बयाज खालीं लेखन करीत असो तो यणे परी -
> १) लक्षुमण वासुदेव भट, उपनांव भिकार भट याच गृहीं प्रथमतेस येऊन ग्रहाचे व्दार फोडून आंत रिघून लाकडाच्या ६ पेटा फोडल्या व बाकी ६ पेटांच्या किल्ल्या घेऊन येवं ११ पेटांतील व इतर ग्रह मजकुरांतील कुल्लीं जिंदगी न्हेली - त्याचा बयाण असमासे भट मजकुराने क्रय सांगिलतेप्रमाणे वस्त्रां जिन्नस, पितांबरां रेशमी व कापडां व जोडे वगैरे आदीकरून तद-

मंदी क्रय ९०० असरफी पात्रें सुमार ३ ओजीं समंदीं ६ मण वजन तदसमंदीं क्रय २४० असरफी व नकदी ५०० असरफी व दागिने १५०० असरफ्यांचे येवं वट्ट नागवून न्हेले समंदी क्रय ३१४० असरफी.

२. रघुनाथ बाळकृष्ण भट व वेंकटेश बाळकृष्ण भट या उभयतांचे गृहीं नंतर येऊन ते ग्रहाचे व्दार भीती वरून भट मजकुरानें उघड केले ते ग्रहातील ३ पेटा फोडल्या व १ कत्रेल फोडले व बाकी ३ पेटांच्या किल्ल्या घेऊन येवं ६ पेटा व १ कत्रेलांतील व इतर गृहांतील कुल्लीं जिंदगी न्हेली, त्याचा बयाण भट मजकुरानें क्रयहि अजमासें सांगितलेप्रमाणे वस्तू जिंदगी,पितांबरां, कापडां जोडे येकून मिळून सुमार क्रय ६०० असरफी व पात्रां २ ओजीं समंदी वजन ४ मण तर समंदी क्रय १६० असरफी व नकदीं ४००६ असरफी व दागिने समंदीं क्रय १००० असरफी येवं वट्ट नागवून न्हेले समंदी क्रय २१६० असरफी सिवाय १ पेट वेंकटेश भट याची व १ राघवेंद्र रामकृष्णाचार्य याची होती. त्या पेटेंतील जिंदगी मज भट मजकुरास ठाऊक नाही. आचारी मजकुर सांगेल.

३) नारायण रघुचंद्राचार्य यांचे गृहीं नंतर येऊन ते गृह म्हणजे मठाची अग्रशाळा ते अग्रशाळेचे पाणदीचे दार फोडून आंत रिघून ते गृहांतील ४ पेटांच्या किल्ल्या घेऊन उघड करून त्या पेटांतील व इतर गृहमजकुरांतील कुल्लीं जिंदगी न्हेली. त्याचा बयाण आचारी मजकुराने क्रयहि अजमासें सांगितलेप्रमाणे वस्त्रा जिन्नस, पितांबरां ४ व कपडां, जोडे वगैरे आदिंकरून नागवून न्हेले तद समंदी क्रय अजमासें ८०० असरफी, पात्रां ओजीं ४ समंदी वजन ८ मण. तदसमंदी क्रय ३२० असरफी, नकदीं ३०० असरफी व दागिने समंदी क्रय २००० असरफी, येवं नागवून न्हेलें समंदी क्रय ३४२० असरफी.

४) रामचंद्र मध्वाचार्य याचें गृह त्याच अग्रशाळेंत. ते गृहांतील कुडीचें व्दार फोडले व कत्रेल १ व पेटूल १ फोडले व किल्ल्या घेऊन २ पेटा उघड करून त्यांतील व इतर गृहांतील कुल्लीं जिंदगी न्हेली. त्याचा बयाण आचारीं मजकुराने क्रयहि अदमासे उध्दारून सांगितलें. वस्त्र जिन्नस,

पितांबरें ५ व इतर वस्त्रे, सेले २ खास रेशमीं, कापडां जोडे वट्ट मिळून अजमासें क्रय ९०० असरफी व नकदीं १५० असरफी व पात्रां ओजीं २ समंदी वजन ४ मण तद क्रय १६० असरफी व दागिने समंदी क्रय अदमासें ५०० असरफी- येवं नागवून न्हेले समंदी क्रय अदमासे १७१० असरफी, सिवाय देपोस्ताचीं वगैरे कागदां बंधन केलेचे दप्तर १, येवं नागवून न्हेलें.

५) हनुमंत पुंडलिकाचार्य त्याच अग्रशाळेंत. त्या गृहाचे माळियेचे व्दार फोडलें आणि गृह मजकुरांतील २ पेटा व लिव्रेर फोडली व किल्ल्या घेऊन पेटा उघडून त्यांतील व इतर गृह मजकुरातील कुल्लीं जिदगी न्हेली. त्याचा बयाण आचारी मजकुराने क्रयहि अदमासे सिध्द करून दिले प्रमाणे वस्त्र जिन्नस व पितांबरां २ व १ शाल १ व जोडे मिळून क्रय अदमासे २०० असरफी व पात्रां वोजें १ तद क्रय ५० असरफी व दागिने समंदी २०० असरफी येवं वट्ट नागवून न्हेले समंदी क्रय ५३० असरफी.

६) वेंकटेश व राघवेंद्र रामकृष्णाचार्य यांचे गृह सदरहू अग्रशाळेंत ते गृहांत पात्रां मात्र होती ती सुमार १ ओजें न्हेलीं. समंदी वजन २ मण तद समंदी क्रय ८० असरफी आचारी मजकुराची १ पेट होती ती रघुनाथ बाळकृष्ण याचे घरी ठेविली होती. ते पेटेंत जिंदगी वस्त्र जिन्नस पितांबर वगैरे मिळून क्रय २०० असरफी व दागिने समंदी क्रय अदमासें आचार्य मजकुराने सांगितलेचें २५० असरफी - येवं नग नागवून न्हेले समंदी क्रय ४G० असरफी. शिवाय दस्तऐवज बांधून ठेवलेचे दप्तर १ येवं बंडवाले यानी नागवून व सिरींचे गृहांतील ८० असरफी येकून ५३० असरफी.

७) अनंत विठ्ठल भट यांचे गृह तेच मठाच्या अग्रशाळेत आहे. ते गृहाचे व्दार फोडून गृह मजकुरांत रिघून बंडवाले यांनी पेट वगैरे फोडून खुद्द भट मजकुराची जिंदगी व इतर लोकानी ठेवण्या ठेविलेच्या त्यांचा कुल्लीं बंडवाले यांनी नागवण केली. त्याचा बयाण भट मजकुर उध्दारून देत आहे तो येणे प्रमाणे खुद्द लहान थोर पेटा १० एकंदर फोडल्या

त्यांतील व इतर गृह मजकुरांतील कुल्ली जिंदगी न्हेली. याचा बयाण वस्त्र जिन्नस पितांबरां व कापडां व जोड वगैरे मिळून अजमासेंक्रय ८०० असरफी पात्रां पैकी १ ओजें सुमार न्हेतील तर समंद वजन २ मण तद् क्रय ८० असरफी नकदीं २०० असरफी व दागिने समंदी क्रय अदमासें ९००६ असरफी येव वट्ट भट मजकुराची जिंदगी नागवून न्हेलेसमंदीक्रय १९८०५ असरफी.

८) विट्ठल राम कामत गाळयें याची १ पेट होती ती फोडून त्यांतील जिंगदी न्हेली त्याचा विवर जोड २ (३५ असरफी) पितांबर १ (९० असरफी) किरगी १ (२० असरफी - रुमाल १, ५ असरफी येवं ते जिंदगीचें अदमासें क्रय १५० असरफी:

९) भिकू लिंग म्हालो आश्रमी पर्तगाळी मजकुर याच्या पेटा २ व त्यांतील १ पेट १ पेटूल होते ते तिनहि फोडून त्यांतील जिंदगी न्हेली. त्याचा विवर भट व म्हालो मजकुर या उभयतानी मिळून सांगत आहे व येणे प्रमाणे-पात्रां होती त्यापैकी १ मण वजनाचीं न्हेतील तर समंदी क्रय ४०५ व दागिने समंदीं क्रय ४०० येकून वट्ट क्रय ४४० असरफी.

१०) वामन गोविंद भट पडवळ गांवकर आश्रमी मोजेकुर याची एक पेट होती त्या पेटेंत पात्रां एक वोजें होते तीं न्हेली समंद वजन होती रुजु वजन २ मण तद समंदीक्रय ८० असरफी.

११) नारायेण वेंकटेश भट, कारई, मौजे लोलियें, तुर्ताश्रमी पर्तगाळी मजकुर याची एक पेट होती ते पेटेंतील जिंदगी नारायण भट मजकुराने उध्दारून देत आहे त्याप्रमाणे पितांबरा ६, पामरी १ रेशमी व मुंडासे २ व तांबिये २ येवं जिंदगी होती ती पेट फोडून बंडवाले यानी नागवून न्हेले समंदी क्रय ६०० असरफी.

येणेंप्रमाणे सदरहू सातहि ग्रहांचे मालक सिवाय प्रकर्णीक घरांत ज्यांची ठेवणी होती त्याणी देखील सांगितलेप्रमाणे बंडवाले मजकुरांनी बहूतजणास ताडण करून व खांदावर सुरिया ठेवून व पोटास बंदुका जोडून नाना तरेने त्रास देऊन प्रकणीक ७ हि ग्रहें नागविता बंडवाले यामधील मुख्य आदमी म्हणून मठ मजकुराचे चावडीवर कांबल पांघरून

किंचीत अंध्धकार अवलंबून बसला होता त्यास आह्मां मधील कोणेच भीतीस्तंव चांगला करून पाहिला नव्हता झालेयाहि सुमार ४० वर्सां उमरीचा व मोठाच होता, भारी मोठा मात्र नव्हे आण मध्यम जातीचा गोरठा होता. गह्ले कांही थोर नव्हते. तो आदमी तेथ प्रथम आले तंव पासून अखेर सातहि ग्रह नागवी पर्यंत प्रकर्णीक ७ वरां रात्र ती मध्य रात्री उपर एक दोन वरां पासून नागवून आले नंतर मठ मजकुराचे घुडाचे आतले व्दाराकडे नागवणेंची कृति करणेंस ग्रह मजकुरांत रिघणारे सुमार २० असामी होतील ते आदमी येऊन तेथ श्रीरामदेवाचा पुजारी यास पकडून धरून खांद्यावर सुरिया वगैरे ठेवून म्हणू लागले की श्री देवाचे अलंकार व श्रीपाद स्वामी यांचा द्रव्य भांडार दाखवून दे म्हणून त्यांतील एक आदमी आपणहि मुख्य म्हणणार सुमार २५ वर्षे वयाचा गोराच होता.तो पुजारी मजकुरास नाना रिती त्रास करूं लागला. इतकेंत जो ऐन मुख्य म्हणून चावडीवर बसून राहिला होता त्याणें सांगितले की श्रीदेवाचे अलंकारांचा तसाच श्रीपादांचे भांडार नागवूं नकात. आम्ही जाऊंया म्हणून पुजारी मजकुरास धरून कुल्ली आदमी बाहीर सरून गेले. ते नदीकडे त्यास घेऊन गेले आण आपआपणांमध्ये वासपुसी करूं लागले की नागवीत असतां पारेनी राहिलेंचे व नागविणारे कुल्लीं बंडवाले एकवटून पुनरेव पुजारी मजकुरास म्हणूं लागले की ज्यापेक्षा देवाचे अलंकार व श्रीपादांचा भांडार खाना दाखवून दिला नाही त्यापेक्षां येथ तुझा प्राणनाश करितो म्हणून खांदावर सुरिया ठेवून व पोटास बंदुकेची मुकटी टेकू लागले ते वेळेस मी पुजारी मजकुराने त्यां कडां मागणी केली कीं तुम्ही माझा प्राणनाश विना उपयोगी करालच परंत श्रीपादांचा भांडारखाना व अलंकार मला ठाऊक नाही श्रीपाद जाणत आहेत. म्हणतां पुन्हा जबरीने म्हणाले की आम्ही एक ताकीद देतो ती सर्व मंडळी समजा की जर हे नागवणे प्रकर्णीक सरकारांत पाडा वगैरे दाखल कराल तर एकंदर सर्वाचें कुटुंबासह वर्तमान समूलप्राण नाश करूं म्हणून सांगून पुजारी मजकुरास तेथून सोडून गेले. अशाच त्याच भितींत आडूं कां कीं ही जागा केवळ अरण्यांत होय. येथ आसमंतांत देखील सरकारची चौकी

नाहीं. आणखी सर्वाही निवेदिलें की प्रकर्णीक नागवण होतां दुसरे प्रांत काणकोण येथील अलम कोमांदांत यांस सदरहूंचा मजकुर जाहीर केला होता त्याणीहि कांहीच वासपूस केली नाही. त्यावरून सदहूचे बंडवाले आणखीही काय करितील म्हणायाच्या भितीस्तंव आम्ही जिकडे तिकडे गेलो येवढी हकीगत सर्वाहि प्रत्यप्रत्येक व एक वाक्यतेने सांगतां मी कुलकर्णी याने सर्वास प्रश्निलें कीं जे बंडवाले ते कोण होतील त्यांमध्यें कोणास परंत तुम्ही ओळखले होते कीं काय अथवा संशय परंत कोणाचाहि तुम्हास ध्यानी पडला आहे की काय म्हणतां त्याणी निवेदिलें की जर त्यांना लागलाच बंदोबस्त जाइलेस चांगली गोष्ट आण साक्षीदारांच्या कथेची अपेक्षा करून विधियुक्त त्यांस शासनांस पात्र करूंये असे जाइलेस् तव पासून बंडवाले व त्यांस सामील असणार देखील ते आमचा विश्वास विध्वंस करितील त्यावरून तो पुरावा अमूक म्हणायाचे सांगण्यास शक्त नहूंत. तशांत किंचित दर्श करितो की प्रकर्णीक नागवण झालेचे प्रातःकालीं मदेर ओढणारे ओढकार म्हणून हे मठ मजकुरीं सर्वाचे ग्रहीं ४-५ रुपयेचे तांदुळ पाहिजेत म्हणूक जिकडे तिकडे फिरून अखेरीस रामचंद्र मध्वाचार्य या कडून १ रुपयेचे घेऊन गेले. अशास कुली वाडेकरांचा संशय व मुकुंद देवळी व रायू देवळी आश्रमी अवें मौजे गांवडोंगरे व इतरहि बहूत जण तेथीलच व्हावे व बंडवाले पैकी कांही आदमीं ते दिवशीं थाळणीस जेवणांस होते म्हणें. ती बातमी आम्हांस दुसरे दिवशीं लागली होती त्यावरून तेथील कोणताहि सामील असतील तर समजेना. सिवाय हे ग्राम मजकुरचेहि कांही असतील कारण ते बंडवाले सदरहूंचे घरांत रिघून आतली बातमी समजावून देण्यास पुनः पुनः बाहीर भितर करीत होते. त्यावरून बाहीर राहणारे ते हे ग्रामांचे किंवा नजीकचे ओळखीचे व माहेतीचे असावे आण आम्हांस भीती की आम्हीं कुटुंबस्थ जर आम्ही सरकारांत वळखिले वळखिले म्हणून वरवर्णीत ३४ नंबराचा 'सर्क्युलर' असल्याने तो काणकोण तालुक्यांतील ग्रामांचे सर्व कुलकर्णी यांस पाठविला असला पाहिजे. आण त्या प्रमाणे त्यानी आपापल्या ग्रामांतील देवालयाचे जबाबिते तयार करून मामलेदार कचेरीस पाठविले असावेत. पण

त्यांच्या नकला कुलकर्णी यांच्या घरात मिळत नसून सरकार दप्तरांतहि मिळत नाहीत. या तालुक्यांतील इतर आलयांच्या कमिट्यांनी पणजींतील पुराभिलेख संग्रह खात्यांत पर्यंत जाऊन शोध केला. मिळाली ती नक्कल पैंगीण ग्रामांतील देवालयांच्या जबाबित्याची.

पैंगीण ग्रामांतील देवालयांची साग्र व सविस्तर माहिती सांगणारा जुन्यात जुना दाखला म्हणजे फक्त सदरील सन १८७० सालच्या जबाबित्याची नक्कल होय.

सन १५१० सालांत पोर्तुगीज आल्बुकेर्क याने गोव्यातील तिसवाडी या बेटावर पांय दिले आणि मग सावकाशपणें गोवा, दमण व दीव हे प्रदेश काबीज केले. ते दि. १९-१२-१९६१ साली भारत सरकारचें पोलीस कारवाईचे पोर्तुगीज सत्ता झुगारून दिली, म्हणजे पोर्तुगीजांनी आपला अधिकार सदरील संघप्रदेशांवर ४५१ वर्षे चालविला. दमणचे असलेले भाग दादरा व नगर हवेली पैकी दादरा दि. २१ जुलै १९५४ साली स्वतंत्र झाला. आणि नंतर १५ दिवसानी नगर हवेली स्वतंत्र झाली. भारत सन १९४७ साली ब्रिटीश सत्तेंतून मोकळा झाला.

पोर्तुगीज सरकारानें महाजनीय देवालयाचे कोड आपल्या अमदानीत ३ दां केले. दि. २१-६-१८६६ रोजी पहिला दि. ३०-१०-१८८६ रोजी दुसरा व दि. ३०-३-१९३३ साली तिसरा, हा आज पर्यंत अंमलांत आहे.

४ था कोड -चौथ्या कोडाचा मसुदा तयार करण्यासाठी दि. १२/९/१९७१ रोजी अखिल गोमंतक देवस्थान परिषदेत श्री. माधव उपेंद्र शेणवी तळावलीकर यांच्या अध्यक्षतेखाल एक समिती नियुक्त केली, आण त्या समितीने मसुदा व पुरवणी मसुदा तयार केला व त्यांजवर विचार विनिमय करण्यास रामनाथी श्रीरामनाथ देवस्थानी दि. ३१-१२-१९७२ रोजी परिषद भरविली, पण विचार विनिमयांनी तो मसुदा पसंत झाला नसल्याने तो वरीष्ट मंजुरीस, अखिल गोमांतकांतील दैवतांच्या इच्छेने गेला नाही. मसुदा सद्य निरुपयोगी ठरला तरी देवालयांच्या डबींतून शेंकडो रुपये खर्च झाले, पण सदरी ३ दां ३ कोड जे सरकारनें केले त्याची फक्त १ प्रत घेण्यास मात्र २ रुपये डबींतून आल्याचे खर्च झाले. आजहि त्याच्या प्रती शिल्लक आहेत.

# पर्तगाळ मठवास्तूचीं ३५० वर्षे

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचें मुख्यालय असलेल्या पर्तगाळींतील मठवास्तूची स्थापना ३५० वर्षापूर्वी परंपरेतील सहावे गुरुवर्य श्रीरामचंद्रतीर्थांनी केली. त्याकाळीं ईशान्यप्लवा कुशावती पाहून ते स्थान मठासाठी निवडण्यात आले असावे.मठ संस्थापनेबद्दल विशेषतः मठाशीं संलग्न अशा श्रीराममंदिरांतील देवप्रतिमांबद्दल अनेक आख्यायिका आहेत. परंतु एवढे खरें की परंपरेतील तो पहिला मठ नव्हता किंवा आजच्या सारखा भव्य विशालहि नव्हता. त्या स्थानाचें महत्व श्रीरामचंद्रतीर्थांनी ओळखून पर्तगाळीच्या वनांत सह्याद्रीच्या पायथ्याशी ही वास्तू बांधून तिला मठाचें मुख्यालय तर केलेंच शिवाय मठाच्या बिरुदावलींत 'पर्तगाळी' हे नांव ठळकपणे बसविलें. त्याचप्रमाणे मठाला दिगंत कीर्ती मिळवून देणारे पुण्यवंत ऋषितुल्य आचार्य श्रीजीवोत्तमतीर्थ यांचे नांवहि मठाच्या नांवांत ग्रथित करून घेतले. ही घटना श्रीशके १५७८ (1656 A.D.) मधली.

तदुपरांत या मठ वास्तूचा टप्प्याटप्प्याने जीर्णोध्दार व विस्तार होत राहिला. त्यांतहि विशेष उल्लेखनीय जीर्णोध्दाराचे कार्य सुभानु संवत्सर शके १६२५ मध्ये मठाधीश श्रीमद् लक्ष्मीनारायणतीर्थ यांच्या कारकिर्दीत केलेल्या जीर्णोध्दारामध्यें घडले. त्यांनी श्रीदेवाचें मध्यगृह देवापुढील अग्रशाळा, शेजासहित चार अग्रशाळा, यज्ञमंडप व सभामंडप, दोन रथ तेरबीदि तथा रथगृह, मुख्यप्राण घूड, मठवास्तूच्या उजव्या व डाव्या बाजूकडील विहिरी, नदीकडील अश्वत्थाचे पेड, खांब परिसरांत अश्वत्थाचें पेड व.धर्मशाळा यांचा समावेश होता.

श्रीशके १७३१ मध्ये शुक्ल संवत्सरांत श्रीमदानंदतीर्थ स्वामीजी गुरुपीठावर असतांना मठवास्तूचा पुन्हा जीर्णोध्दार करण्यात आला. जीर्णोध्दारित कार्याचा तपशील असा - श्रीरामदेवाचें गर्भागार, श्रीमुख्यप्राण घुडाचे खांब, रथगृहाकडील पायऱ्यांची पाज, सांतेमळावरील अश्वत्याचे कट्टे, रथगृहाकडील अश्वत्थाचे कट्टे.

परंपरेतील विसावे आचार्य श्रीइंदिराकांततीर्थ स्वामीजींच्या कारकिर्दीत शके १८५६ मध्यें श्रीराम मंदिरासमोरील चावडी व मोठी माडी संपूर्ण बांधून काढण्यात आली.

शके १९८८ मध्ये श्रीव्दारकानाथतीर्थ स्वामी महाराजांनी मठवास्तूचे आवश्यक जीर्णोध्दार करवले. श्रीराम देवाची पुनःप्रतिष्ठा, सुवर्ण लेपित कलश प्रतिष्ठा व

गोशाळा यांचा या कार्यामध्ये समावेश आहे.

विद्यमान मठाधीश श्रीविद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी श्रीशके १८९५ मध्ये श्री गुरुपीठावर अधिष्ठित झाल्यानंतर श्रीमठस्थापनेचा पंचशताब्दि महोत्सव साजरा करण्यात आला. (श्रीशके १८९९) आणि नंतर सपाद पंचशताब्दि महोत्सवहि संपन्न झाला.

दरम्यानच्या काळांत पर्तगाळी मठवास्तू व एकंदर क्षेत्राच्या विकास व विस्ताराची एक बृहद् योजना कार्यवाहीत येऊ शकली. यामध्यें श्रीराम मंदिराच्या व श्रीवीर विट्ठलाच्या मंदिराभोवती चौफेर परंपरागत वास्तुशिल्पाच्या मदतीने एक शिलामयमाला रूपी बांधकाम करून मठाचा विस्तार करण्यात आला आणि निवासाच्या खोल्या व अनेक प्रशस्त दालने, अन्य मठाधीशांच्या वास्तव्यासाठी व्यवस्था, कुशावती नदीवर पाषाणी घाटाचें बांधकाम, मुख्य रथविदी आवाराचा विस्तार व कठड्यांचे बांधकाम, त्याचप्रमाणे राष्ट्रीय हमरस्त्यावर व मठवास्तूच्या दर्शनी भागी दोन महाव्दारे उभारण्यात आली. सौंदर्य, स्थापत्य, सुविधा, आकार व पावित्र्य आदि कोणत्याही निकषावर पर्तगाळी मठवास्तू उठून दिसेल अशीच आहे.

❀❀

## श्री आनंदतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

१) १७४३ वृष (1821 A.D.) ज्येष्ठ वद्य १३ रोजी बाळ्ळी मठावर ठेऊस शिलेची विट्ठलाची प्रतिमा करून घेणेस पैगिणीच्या सुतारास विडा दिला (खाते बुक १ अ. पान १४३)

२) १७४५ (1823 A.D.) शिवेश्वर (मुडगेरी) येथील मठ जीर्णोद्धार केला. समोरच्या अग्रशाळेस माळी केली.

३) १७४६ (1725 A.D.) फाल्गुन शु. ७ नायकनकट्टे (आतां कुंदापुर तालुका) येथे वर्गी दहा जणाच्या कडून मठ बांधण्याचा कार्यास चालना दिली.

# श्री पूर्णप्रज्ञतीर्थ स्वामीजींच्या जीवनकालांतील प्रमुख घटना

**संन्यासदीक्षा** तारण नाम संवत्सर, शके १७४६ (1824 A.D.)
चैत्र पौर्णिमा, पर्तगाळ मठांत

१. तारण १७४६ (1824 A.D.) वैशाख शु॥ तृतीया, शनिवार बाळ्ळी येथील जीर्णोद्धारीत मठीं शिलामय नूतन श्रीविठ्ठल देवाची गुरुवर्य श्रीमत् आनंदतीर्थांसह शिष्य श्रीमत् पूर्णप्रज्ञतीर्थ गुरुशिष्य स्वामी द्वयांच्या हस्ते प्रतिष्ठा.

२. आश्रम वर्षींच गुरुशिष्य स्वामीनी महाशैल, लोलिये, बसरूर, गोकर्ण वगैरे परिसरांत संचार.

३. जय संवत्सर शके १७५६ (1824 A.D.) सांतेमळावरील पाज बांधून घेतली. खर्च रक्कम शंकर प्रभू देसाई बोरूस यांजकडून घेतली. एकूण खर्चः रु. ५३५/-.

४. शक पार्थिव १७४७ (1825 A.D.) माघमासी श्रीआनंदतीर्थ गुरुस्वामी आणि शिष्य श्रीपूर्णप्रज्ञ तीर्थ स्वामीजी यांनी व काशीमठीय श्रीसुमतींद्र तीर्थ मठाधीशांची भेट बसरूर येथील दिग्विजय विठ्ठल मठीं झाली. नंतर नागरमठ पर्यंत उभयतांचा एकत्र संचार झाला.

५. श्रीमदानंद तीर्थ श्रीपाद वडेर स्वामी सर्वधारी सं. १७५० श्रावण शु॥ ९ मी मंगळवारी वृन्दावनस्थ. पर्तगाळी मठांत वृंदावन (1828 A.D.)

६. १७५० शकांत शिवेश्वर मठास श्रीविठ्ठल देवाच्या अमृतपडीस - अस्नोटी जवळ असलेली गुडो शेत खरेदी करून कृष्णार्पण केलें (1828 A.D.).

७. 1829 A.D. दिगाळी (पाळोळे) गजनीचा बांध रुपये ६०० खर्च करून बांधला.

८. 1830 A.D. व्यंकटापुर देवालयाच्या उत्तरदिशेची अग्रशाळा बांधली. भटकळ गोपीनदी तीरावरती श्री नारायण तीर्थांच्या वृन्दावनाचा जीर्णोध्दार.

९. 1832 A.D. गोकर्ण श्रीकोटीतीर्थाची पश्चिम बाजू बांधून दिले त्यासाठी रुपये ३७५.०० खर्च लागला.

१०. विजय संवत्सर शके १७५५ (1833 A.D.) वैशाख वद्य ८ मी रोजी

श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ स्वामीजींनी श्रीरामनाथ देवाचा नूतन उत्सव करावयाचा संकल्प करून नवी लालखी श्री रामनाथ देवालयीं पाठविली. उत्सव चालविण्यासाठी रु. ५००/- श्रीरामनाथ संस्थानी पोंचते करून त्या रकमेच्या व्याजातून वर्ष प्रतिवर्षी अक्षय तृतीयेच्या दिवशीं उत्सव चालविण्याची व्यवस्था केली.

११. 1837 A.D. शिवेश्वर (मुडगेरी) मठांत असलेला लेखः

योगोकर्ण मठाधिनाथ कमलाकान्त प्रतिष्ठापितो ।
यस्य श्रीमुडगेरीगस्य कृतवान् आनंद तीर्थोमठम् ॥
पूर्णप्रज्ञगुरोः कृतिश्चलसति श्रीचन्द्रशालामिधा ।
मुख्यप्राणनुतस्सभक्तवरदः श्रीविठ्ठलः पातुनः ॥१॥

१२. 1837 A.D. बोरीमळावर अश्वत्थाचे पेड जातेवेळी उजव्या बाजूस अष्टधारा. ह्यात सतरा बांधून घेतले.

१३. विलंबी संवत्सर शके १७६० (1838 A.D.) चैत्र वद्य ५ मी रोजी पर्तगाळमठांत श्रीमन्याय सुधा पाठाचें मंगल करण्यात आले. याच वर्षी स्वामीजींची पंढरपूर यात्रा.

१४. शके १७६० विलंबी संवत्सरांत (1838 A.D.) माशे निराकार देवाकडील नदीचे आर्क (सांकव) चिऱ्यानी बांधलें.

१५. शके १७६४ शुभकृत संवत्सरांत (1842 A.D.) पणसखंडे 'मठांत' श्रीव्यंकटेश देवास सोन्याचा मुकुट (३३ तोळे १० आणे) करवून श्रीस अर्पण.

१६. शके १७६४ शुभकृत संवत्सरांत (1842 A.D.) फाल्गुन शु· १० मी शनिवार रोजी मंगळूर रथबिदींत नूतन स्वमठांत देव प्रतिष्ठा व शिखरावर स्वर्णलेपित कलशची प्रतिष्ठा.

१७. शके १७६५ शोभन नाम संवत्सर (1843 A.D.) ज्येष्ठ वद्य ५ मी रोजी कडवाड मठीं श्रीलक्ष्मी व्यंकटेश देव प्रतिष्ठा.

१८. शके १७७२ साधारण संवत्सरांत (1850 A.D.) तिरुपती श्रीव्यंकटेश देवास दर दिवशी नवनीत आरतीचा आवंड क्रम चालविण्यास रु. ७००/- चा भरणा केला.

१९. १७७२, साधारण (1850 A.D.) अधिक वैशाख वद्य ८ शनिवार, मंजेश्वर श्रीनरसिंह देवाचे भंडारांत १० मुयेदें अर्पण केली असून तेथील अधिकारी

या मुयेदांस्मृत्यर्थ प्रतिवर्षी माघ शु।। ९ मी दिवशी दुपारी ब्राह्मण समाराधना व रात्रौ उत्सव सुध्दां पूर्णप्रज्ञतीर्थ स्वामी महाराजांचे नांवावर अजूनहि चालवीत आहेत.

२०. 1854 A.D. पणसखंडे मठास जीर्णोद्धारासाठी रुपये १००.०० दिले.

२१. 1858 A.D. अवर्सेमठ बांधण्यास पट्टी करून मठ लांबी हात १९, रुंदी हात १३, उंची हात ७ बुन्याद निराळी करून, बोबदियार चुना व काव सुध्दा काडून देयाचो काम ठरवून गंवडा नेमक केला.

२२. सांतेमळावर जाण्याच्या मार्गावर आर्क (पूल) बांधलें. (1861 A.D.)

२३. शके १७८३ दुर्मति संवत्सर काशींत पंचगंगा घाटावरील स्वमठीं नित्य १२ ब्राह्मणाचें अन्नसंतर्पण चालविण्यास काशी नरेश ईश्वरी प्रसाद नारायण सिंह बहादूर, रामनगर यांजकडे रु. ६०००/- ची ठेव ठेवलीं. (18.1.1862 A.D.)

२४. शके १७८९ सिध्दार्थी (1867 A.D.) श्रीव्यंकटरमण देवस्थान कुमठा येथे प्रतिवर्षी मध्वनवमी दिनी उत्सव चालविण्यास देवालयीं तरतूद केली.

२५. शके १७९० विभव संवत्सर (1868 A.D.) पैंगिणी येथे परशुराम देवालयीं सहस्र ब्राह्मण भोजन आयोजन.

२६. शके १७९० विभव संवत्सर (1868 A.D.) साली पर्तगाळीस श्रीरामदेवाच्या घुडास ताम्रपटा मारण्यात आला.

२७. शके १७९१ शुक्ल संवत्सर (1869 A.D.) पसरे बांधावर नदीस ४१ हात लांबीचा आर्क बांधण्यात आलें.

२८. शके १७९३ प्रजापति संवत्सर (सन 1771) मंजेश्वर येथील श्रीनरसिंह देवास शंभर गिंदलाच्या सुवर्णाचा सोर (माला) अमेंबळ नारायण पै मंगळूर यांजकडून पाठविला आहे. खर्च रुपये ३००.००

२९. शके १८०० बहुधान्य सं. (1878 A.D.) श्रीक्षेत्र गोकर्ण येथे स्वमठांत शिखराला ताम्रपट्टा बसविला.

३०. 1878 A.D. श्रीगोकर्ण येथील मठाचे चोही बाजूचे अग्रशाळांचा जीर्णोद्धार व मठाचे घुडाचे शिखरास ताम्रपटा घातले.

३१. शके १८०० बहुधान्य सं. (1878 A.D.) सालीं काशीमठीय. श्रीभुवनेद्र व त्यांचे शिष्य श्री वरदेंद्र या दोन्ही स्वामी महाराजांचा चातुर्मास व्रताचरण मंगळूर रथबिदींत श्रीपूर्णप्रज्ञ स्वामीजींनी उभारलेल्या नूतन मठांत चालला होता.

३२. **यात्रा क्षेत्र- दर्शनः-**

१) पंढरपूर यात्रा १७६० (1838 A.D.)

२) तिरुपति, शिवकंचि, विष्णुकंचि, श्रीमुष्णा, -
श्रीरामेश्वर, मदुरा - मीनाक्षी, कलिकोट मार्गे मंजेश्वर (१७७१ - ७२) सन् (1850 A.D.)

३) श्रीक्षेत्र काशी शके १७८३ (सन् (1861 A.D.)
चातुर्मास व्रताचरण स्वमठीं पंचगंगा घाटावर

४) शके १७८६ (सन् (1864 A.D.) माघ शु.।। १३ शी मंजेश्वर येथे काशीमठाधीश श्रीभुवनेंद्र तीर्थ स्वामी यांचे मठांत आगमन. तेथ श्रीभुवनेंद्र स्वामी मुक्कामी होते. दहा दिवस मंजेश्वर मुक्कामी उभय स्वामी यांचा मुक्काम.

श्रीपद्मनाभतीर्थ यानी गुरूंच्या हयातींत रक्ताक्षी संवत्सर १७८६ (सन 1864 A.D.) चातुर्मासास बिळगींत राहून बेंगळूर मार्गाने तिरुपति (कल्याणोत्सव, वज्रकवचोत्सव, श्रीवेंकटेशास तांब्याचा तुलाभार) श्रीमुष्ण, कुंभकोण श्रीरंग, विष्णुकंची, शिवकंची, मदुरा - कामाक्षी श्रीरामेश्वरांत (मठांत श्रीमुख्यप्राण शिलेच्या प्रतिमेची प्रतिष्ठा केली.) पोचून धनुष्कोटि येथे स्नान वगैरे होऊन, दर्भशयन, तोताद्रि, कन्याकुमारी, अनंतशयन, जनार्दन कोल्लां, कायंगोळ, परकाट, अनंत नारायणपूर, कोच्चि, कडंगनूर, कलिकोट, तलचेरी, होसदुर्ग मार्गाने मंजेश्वरांत पोंचून क्रोधन संवत्सर १७८७ (1865 A.D.) ज्येष्ठ शु।। व्दितीया काशीमठाधीश श्रीभुवनेंद्र तीर्थ यांची भेट. परस्पर मठ वास्तव्यांत मठाधिशांनी जाऊन भिक्षा होऊन काही दिवस येणे जाणे आमोद दायिक घडून शके १७८७ क्रोधन संवत्सर चातुर्मास व्रताचरण मंगळूरमठीं होऊन कार्तिक वद्य ८ मी रोजी मंगळूर मठीं श्रीभुवनेंद्र तीर्थ भेटीस आले. श्रीनारायणाचार्याच्या मठांत श्रीभुवनेंद्र तीर्थानी बोलावून विठ्ठलाचार्याकडून श्रीपादांस पादपूजा करविली, व्यंकटरमण देवस्थान मंगळूर आणि उल्लाळ नरसिंह देवालयांत, कण्वतीर्थावर, स्नानास श्रीभुवनेंद्र तीर्थांसह गेले; तेथून मंजेश्वरास उभय श्रीपादानी प्रयाण घेऊन श्रीभुवनेंद्र तीर्थानी त्यांच्या मठीं व स्वीय श्रीपादांनी देवैय्य भट यांच्या बिराडी वास्तव्य करून चंपा षष्ठी रथोत्सवास रथावर काणूक केली.

*परिशिष्ट - १*

# सन्मानपत्र

## गोकर्णमठाचे सारस्वत धर्माध्यक्ष यांस, काशीस्थ पंडिताचें मानपत्र

श्री :

श्रीमत्परमहंसपरिव्राचकाचार्यपदवाक्यप्रमाणपारावारीणयम-
नियमाद्यष्टाङ्गयोगसंपन्नश्रीमद्वैष्णवसिद्धान्तप्रतिष्ठापनाचार्य
श्रीमत्सकलसुरनिकरमुकुटमणिरंजितदिव्यश्रीवीरविठ्ठलचरण
कमलाराधकश्रीमल्लक्ष्मीनाथतीर्थश्रीपादवडेरकरकमल-
संजातश्रीमदानन्दतीर्थश्रीपादवडेरवरकुमारकश्रीमत्पूर्णप्रज्ञ-
तीर्थश्रीपादवडेरचरणकमलेषु जयशीलेषु

परमप्रीतिपूर्वकानुगृहीतवाराणसीक्षेत्रवास्यनेकपंण्डितकृता नमो नारायणायेत्यादिवचनपूर्विका विज्ञप्तयस्समुल्लसन्त्वद्य श्रीमुखसंवत्सरपौषशुक्लप्रतिपदवधि वयं काशीक्षेत्रे क्षेमयुता भवदीय क्षेमाद्याकूतं क्षणेक्षणे चित्तानुवर्ति भाव्यमिति प्रार्थयमानास्समः । विशेषस्तु । भवतामत्र दक्षिणदेशस्थपर्वतकाननस्थात्स्वकीयमठाच्छ्रीकाशीगंङ्गायात्रार्थमागत्यात्रत्यस्वकीयपञ्चगङ्गातीरस्थ मठस्थितानां दर्शनार्थ सर्वैरस्माभिरागत्य श्रीमच्चरणानां पूजनं वन्दनं च कृतं तदा चास्मदीयसकलशास्त्र विचारसमये श्रीपादकृच्छात्रव्यवहारकालेऽस्माभिस्सर्वशास्त्रभिज्ञता भवद्गता ज्ञाताभूत् अतो यूयं सर्वशास्त्रभिज्ञा इति ज्ञात्वा विद्यापीठमध्ये सभायां श्रीमताभिवन्दनं च कृतं यूयं च सर्वज्ञा प्रकाशवंत इति जानीमः सर्वैरपि सर्वदिक्षु यूयं वन्दनीया इतीक्षामहे । सर्वज्ञेषु किमधिकं विज्ञापनेनेति शम् ।

| | |
|---|---|
| १ श्रीमद्भट्टोपाव्हनारायणशर्माणः । | १ श्रीवेचनपण्डितस्य । |
| १ श्रीमद्भट्टोपाव्हकमलाकरशर्माणः । | १ धर्माधिकारीश्रीढुण्ढिराजशर्मा । |
| १ श्रीकाशिनाथशास्त्रिणो वयम् । | १ श्रीद्विवेदवस्तिरामपण्डितानान् । |
| १ श्रीवासुदेवशास्त्रिणो वयम् । | १ श्रीसुकुलोपाव्होमारायशर्मणाम् । |
| १ श्रीराजारामशास्त्रिणः । | १ श्रीदेवदत्तपण्डितानाम् । |
| १ श्रीविठ्ठलशास्त्रिणः । | १ श्रीदुर्गादत्तशर्माणः । |
| १ श्रीशंकरशास्त्रिणो वयम् । | १ श्रीचिरंजीविपण्डितानान् । |
| १ श्रीपण्डितयोगेश्वरशर्माणः । | |

( मूळ लेख मठांत आहे )

## ( *महाराष्ट्रभाषार्थ* )

परमप्रीतिपूर्वकानुगृहीत वाराणसीक्षेत्रवासी, अनेक पंडित यांच्या कृतानेक नमो नारायणाय इत्यादिवचनपूर्विका विज्ञप्ति प्रकाशित होओत. अद्य (श्रीनृपविक्रमशके १९१८) श्रीमुखसंवत्सरे पौष शुक्ल प्रतिपदापर्यंत आम्ही काशीक्षेत्री क्षेमयुक्त आहों. आपणांकडील क्षेमादि अभिप्राय वारंवार सजण्यांत यावा अशी प्रार्थना करीत आहों. विशेपस्तु दक्षिण देशांतील आपल्या पर्वतकानन (पर्वतकाली) एथील स्वकीय मठाहून काशीगंगायात्रार्थ येऊन एथील पंचगंगातीरस्थ स्वकीय मठामध्यें आपण राहिल्या वेळीं आम्ही सर्वांनी येऊन श्रीमच्चरणांचे पूजन आणि वंदन केले. आणि त्या वेळेस आम्हीं सकलशास्त्रांची चर्चा चालविली. अशा समयीं श्रीचरणांनीं जो शास्त्रव्यवहार केला, त्यावरून आपली सर्व शास्त्रांच्या ठायीं अभिज्ञा आहे असें आमच्या अनुभवास आलें. त्यावरून आपण सर्वशास्त्रभिज्ञ आहां असें जाणून विद्यापीठाच्या ठायीं सभेमध्यें श्रीमंतांना आम्ही अभिनंदन केलें. आपण सर्वज्ञ आणि प्रकाशवंत आहां असें आम्हीं जाणतों. सर्वांना सर्वदा सर्वदेशी आपण वंदनीय आहां असें आमच्या पाहण्यांत येतें. सर्वज्ञांप्रत विशेष काय लिहिणें हे विज्ञापना.

❀

**पर्तगाळ येथील श्रीरामदेवाच्या बाहेरील चौकाच्या डाव्या बाजूस भिंतीत बसविलेल्या शिलालेखाचा यथा उतारा,**

**आकृति २९.५ सें. मि. X ३१.५ सें. मि.**

**॥ श्रीरामचंद्रः प्रसन्नोऽस्तु ॥॥**

**॥ श्रीमत्परमहंस श्रीमद्रमानाथ तीर्थ करकमल संजात ।**

**श्री मल्लक्ष्मीनाथ तीर्थ करकमलसंजात ।**

**श्रीमदानंद तीर्थ श्रीपादैः ॥॥**

॥श्रीमन्नृपशालिवाहन शके १७३१ शुक्ल नाम संवत्सरे वैशाख कृष्ण ७ म्यां ॥

॥ श्रीचा मठजिर्णोद्धारास प्रारंभ करून ॥

॥ शके १७३२ प्रमोद ज्येष्ठ शुक्लाष्टम्यांर वौ मध्यान्ह समये ॥

॥ उत्तरा नक्षत्रे सिंह लग्ने पन्यनामदेवालयं

॥ तंत्रसारोक्त प्रकारेण श्रीरामदेव जीर्णोध्दार प्रतिष्ठा रात्रौ रथोत्सव ॥

॥ शुक्ल ९ म्यां महारथोत्सव शुक्ल १० म्यां अवभृथया प्रा ॥

॥ संवर्धित केलेचा शक ॥ निरंतरायोऽस्तु ॥ (1810 A.D.)

## सन्मानपत्र

*परिशिष्ट - २*

### गोकर्णमठाचे सारस्वत धर्माध्यक्ष यांस पुणेंकर पंडितांचें मानपत्र

श्री :

श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थश्रीपादवडेरश्रीफलमारमठसंप्रदायप्रवर्तक
श्रीपादजयशीलचरणकमलेषु.

परमप्रीतिपूर्वकानुगृहीतपुण्यग्राममिलितानेकदेशवास्यनेकपंडितकृतनमोनारणायेति विज्ञप्तयः समुल्लसंतु अद्य दुंदुभिसंवत्सरमार्गशीर्षसित १३ तिथ्यां वयं क्षेमयुताः स्मः भवदीयं क्षेममनुदिनं चित्तानुवर्ति भाष्यमित्याशास्महे विशेषस्तु भवतः काशीयात्रां कृत्वात्रागतास्तदानीं वयं सर्वे दशनार्थ प्राप्ताः तदा भवदीयवेदान्ताद्यनेकशास्त्रविचारं ज्ञात्वा यूयं सर्वशास्त्रभिज्ञाः प्रकाशवंत इतीक्षामहे किं च काशीस्थानेकपंडितदत्तश्लाध्यपत्रिकां दृष्ट्वा वयं संतुष्टा अभूम अस्माभिरपि वंदनादिकं कृत्वा तद्वदिदं पत्रमर्पितं अभिज्ञेषु किमधिकविज्ञापनेनेति शम्॥

१ अत्र संमतिः आबाचार्याणां सामाईग्रामस्थानां ।
१ अत्र संमतिः कित्तूरनृसिंहाचार्यस्य।
१ अत्र संमतिः गोपाळचार्याणां श्री करहाटक्षेत्रस्थानां ।
१ हनुमदाचार्यमठकरी ।
१ कृष्णाचार्याणां संमतिः ।
१ अत्र संमतिः रावजीआचार्याणां वैराजक्षेत्रस्थानां ।
१ मध्वाचार्याणां सामनाईग्रामस्थानां संमतिः ।
१ आपाचार्याणा संगमेश्वरग्रामस्थानां
१ गंगाखेडस्थानां हयग्रीवाचार्याणां संमतं।
१ कूर्माचार्याणां हचोळीग्रामस्थानां ।
१ संमतोयमर्थः वायूपनामक नासिकवासिनां आत्मारामशास्त्रिणां ।
१ बालकृष्णशास्त्रिमुनीनां संमतं ।
१ अत्रार्थ गोविंदपुराणिकांनां संमतिः ।

( मूळ लेख मठांत आहे. )

### *( महाराष्ट्रभाषार्थ )*

परमप्रीतीपूर्वकानुगृहीत पुण्यग्रामीं एकत्र मिळालेले अनेकदेशवासी अनेक पंडितकृत नमो नारायण इति विज्ञप्ति प्रकाशित होओत. अद्य (श्रीनृपशालिवाहनशके १७८४) दुंदुभि नाम संवत्सर मार्गशीर्ष शुक्ल १३ पर्यंत आम्ही क्षेमयुक्त आहों, आपणांकडील क्षेम निरंतर समजण्यांत यावें अशी इच्छा आहे. विशेषस्तु आपण काशीयात्रा करून इकडे आलां त्या समयी आम्हीं सर्वजण दर्शनासाठी आलो; तेव्हा वेदान्तादि अनेक शास्त्रांमध्ये आपण चालविलेला विचार पाहून आपण सर्वशास्त्रभिज्ञ प्रकाशवंत आहां असे आमच्या लक्षांत आले. आणि काशीस्थ अनेक पंडितांनी दिलेली प्रशंसापत्रिका पाहून आम्हास संतोष झाला. आम्हीही वंदनादिक करून त्याप्रमाणेंच हे पत्र अर्पिले आहे. अभिज्ञांप्रति विशेष काय लिहिणें हे विज्ञापना.

## श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांचा दक्षिण प्रांती संचार

१) १७८६ रक्ताक्षी माघ शु. १३ मंगळवारी. मंगळूराहून मंजेश्वर येथे काशी मठीय भुवनेंद्र तीर्थ स्वामी यांचे मठांत पोहचलें तेथे श्रीभुवनेंद्रस्वामी मुक्कामी होते. एकंदर दहा दिवस मंजेश्वर येथे उभय श्रीपाद एकत्र राहून स्वागतादिक होऊन माघ वद्य ९ रोजी स्वीयस्वारी मंगळूरकडे निघाली.

२) क्रोधन १७८७ वैशाख वद्य प्रतिपदा गुरुवारी, श्रीपद्मनाभ तीर्थस्वामी रामेश्वर यात्रेस जाऊन येते वेळी मंजेश्वर मुक्कामी असता १७८७ क्रोधन सं. वैशाख वद्य ९ शुक्रवार रोजी काशीमठीय श्रीभुवनेंद्रतीर्थ मंजेश्वर यांच्या मठांत मुक्कामी असतां बारा दिवस उभय स्वामी मंजेश्वर मुक्कामात राहून, येथील स्वीय स्वारी ज्येष्ठ शु. ७ बुधवार रोजी मंगळूर येथील स्वीय मठी पोहचली.

## श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांच्यावेळी बंडाई

१७८६ श्रीमुख (1874 A.D.) मार्गशीर्ष वद्य १३ शी भौमवार रात्रौ भगवंत केणी व राणे यांनी श्रींचे मठीं येऊन बंडाई केलेवेळी उभय श्रीपाद स्वामी व कृष्ण गोविंद शेणवी धेंपे व व्यंकटेश फळदेसाई पैंगिण, गोपाळ त्रिविक्रम प्रभू देसाई व जीवोत्तम अनंत प्रभू देसाई, लोलये, नरहरि तीमर्स पुराणीक, भाटकोळ व आचार्य पर्तगाळीकर असून श्रीमठाच्या इवेंतार बुकांत दृष्य होत असलेले रुजवात केली. यादस्त बद्दल राणे यास संभावना कृष्ण गोविंद शेणवी याने चार हजार असुरपी दिली आहे. सदरी विषय नक्कदीसह पाठविलेचा श्रीपादाज्ञेवरून व्यंकटेश फळदेसाई, गोविंद बाबाचार्य व पांडुरंग प्रभू शेळकार या तिघानी पणजीहून परत पर्तगाळ मठीं आणिलें व बाकी दोन पेटारे एक पेट असलेची शके १७८८ धाता सं. चैत्र शु.॥ २ ता. २७-३-१८७६ रोजी बाबनी फळ याबरोबर पाठविलेचा चैत्र शु॥ ५ मीस पोहोंचलेल्या रायसांत दखल होत आहे. (इंवेतार वही पृ. ३८)

❀❀

## काशी येथील पंचगंगा घाटावर श्रीसंस्थानच्या श्री लक्ष्मीनारायण मठात असलेला शिला फलकाचा यथा उतारा

**(शिलाफलकाची आकृति २२ सें.मि. X ३६ सें. मि.)**

### ।। श्रीलक्ष्मीनारायणः प्रसन्नोऽस्तु ।।

श्रीवीर विठ्ठल पदाब्ज रसज्ञ भृङ्गः श्रीमध्व तीर्थमत गुंजन पूरिताशः ।
लक्ष्मीशनाथ पदसंस्कृत संप्रतिष्ठ आसीभ्दुविप्रथितकीर्तिचयोयतीन्द्रः ।।१।।

तत्सच्छिष्यो योगिवरः श्रीपतिभक्त श्चानन्दाख्योऽभूद्यतिमुख्यः श्रुतिनिष्ठः ।
तच्छिष्योऽभूद्वैष्णव तंत्रैकगुरुः श्रीपूर्णप्रज्ञस्तीर्थ पदांतार्थ वदास्यः ।।२।।

यो मध्वनिर्मित सुधां वसुधातलेऽपि साधूनध्यापयदनूनमनेकवारम् ।
श्रीकाशिकास्वमठमेत्यचशेष भाष्ये वैदुष्यमापसहसान्यदुरापमुच्चम् ।।३।।

विद्वत्प्रेम्णा पंडित मान्यो विदुषां यःसत्काराद्यैःस्तोषमकार्षीत्सकलानाम् ।
भोज्यस्वन्नैर्विप्रसहस्त्रसमताप्सरित्सत्रंचक्रेचात्रतदस्त्वारविचन्द्रम् ।।४।।

वसुविधुनवपृथ्वीसंमिते वैक्रमाब्दे सहसि धवल पक्षेभार्गवेनागतिथ्याम् ।
ध्रुवयुजिहरिक्रक्षेप्रावृतत्सत्रमेतभ्दवतु भुविचिराय प्रीतिदं भूसुरेभ्यः ।।५।।
तारकांतस्यमानेन तदा दुर्मतिनायकः गीर्वाणाचार्यमानेन श्रीमुखोवत्सरोऽभवत्।।

श्रीशके १७८३ (1862 A.D.) श्रीमुख नाम संवत्सर मार्गशीर्ष शुध्द ५ भृगुवारी काशिक्षेत्र पंचगंगे घाटावर श्रीलक्ष्मी नारायण मठांत श्रीमत्पूर्णप्रज्ञतीर्थ श्रीपाद वडेर याणी निरंतर बारा ब्राह्मणाचे अन्न सत्र प्रतिष्ठापीत विदीत असावे.

---

*मलपृष्ठ ४ वर प्रकाशित रेखाटन पोर्तुगीज सरकारने १८८६ साली प्रसिध्द केलेल्या सचित्र ग्रंथातून घेतलेले आहे. लिस्बन येथील जॉर्ज जिओग्राफिकल संस्थेने ते प्रसिध्द केले आहे. रेखाटनाचे शीर्षक पर्तगाळ मठाच्या स्वामीच्या महालातील अग्रशाळा. (प्रकाशकः ए. लोपीस मेंडीस)*

## श्रीमदानंदतीर्थांचा यात्रा संचार

श्री शके १७३९ (1817 A.D.) ईश्वरनाम संवत्सराच्या वैशाख शुक्ल ८ मी च्या दिवशीं श्रीमदानंदतीर्थ मुंबई येथील मुक्कामांतून तीर्थयात्रेला निघाले. सुरतमार्गे प्रवास करून निज श्रावण वद्य ५ मी या दिवशीं ते प्रयाग क्षेत्रांत दाखल झाले. त्याच महिन्यांत व्दादशीला ते काशी क्षेत्रांत पोंचले. त्या संवत्सरांतील चातुर्मास त्यांनी बिंदुमाधव (पंचगंगा) घाटावरील स्वमठांत केला. व्रताचा स्वीकार भाद्रपद शु. ५ मी सोमवार हा होता. व्रतसंकल्प करितेवेळी प्रायश्चित विधीच्या अनुषंगाने स्वर्णदान करण्यात आले. मार्गशीर्ष शुध्द ११ शी ला श्रीस्वामी गया येथे दाखल झाले आणि त्याच महिन्याच्या कृष्ण पक्षांत दशमीच्या दिवशीं पुन्हा वारणासी येथे स्वमठीं मुक्कामासाठी आले.

परतीच्या प्रवासाच्या नोंदीवरून असे दिसते की, अयोध्या, नैमिषारण्य, हरिव्दार, आदि क्षेत्रांत यात्रा करीत बहुधान्य संवत्सर शके १७४० मधील चैत्र शुध्द ११ शी ला देवप्रयागला पोचले होते. तेथून त्यांनी श्रीनगर, कर्णप्रयाग, जोशीमठ, पंडुकेश्वर मार्गे, बद्रिनाथला प्रस्थान केले. श्रीबद्रीनारायणाचे दर्शन त्यांना वैशाख शुध्द १० मीला घडले.

तेथून परतीचा प्रवास सुरू झाला. हरिव्दार, कनरवल, कुरूक्षेत्र, मथुरा, ब्रह्मावर्त मार्गे आषाढ पौर्णिमेला श्रीमदानंद तीर्थ काशी येथील स्वमठांत पुन्हा दाखल झाले. त्याच दिवशी त्यांनी चातुर्मास व्रताचरण सुरू केले. श्रावण महिन्यांत वारणासी मठवास्तूमध्ये वास्तु शांति करविली.

काशींतील मुक्कामांत काशी नरेश राजरूपसिंह ह्यांनी श्रीमदानंद तीर्थांना विशेष आमंत्रण देऊन सन्मानपूर्वक राजवाड्यांत नेले व राजपुत्र अलर्क सिंह यांजकडून पाद्यपूजा करविली. राजाच्या विनंतीवरून श्रीस्वामीजींनी राजाला श्रीलक्ष्मीनारायणाची पितळी प्रतिमा व एक तुलसी मणिमाला पाठविल्या.


चातुर्मासोत्तर आश्विन शुक्ल १३ शी ला श्रीस्वामीजी शिवपूर येथे मुक्कामासाठी पोचले. नंतर बडोदा-सुरत मार्गे फाल्गुन अमावस्येला ठाणे (मुंबई) येथे दाखल झाले. गोव्याला परतण्यासाठी प्रस्थान घेऊन शहापूर, नंदगड, खानापूर मार्गे प्रमाथी संवत्सरांतील (१७४१ शक) ज्येष्ठ शुध्द १२ शीला पणजीत पोचले. त्या वर्षीच्या चातुर्मासाचे माशेल (गोवा) येथे आचरण करण्यात आले. तब्बल साडेतीन वर्षे भ्रमंती करीत तीर्थयात्रा केलेल्या श्रीमदानंदतीर्थांचा हा एक विक्रमच होता. या यात्रेच्या काळांत लागोपाठ दोन वर्षे वारणासींत चातुर्मास घडलें व तिसरा चातुर्मासही पर्तगाळ मठाबाहेर माशेल येथे आचरण्यात आला. या कालावधीत त्यांचे गुरु पीठावर विद्यमान होते.

श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांचे प्रिय शिष्य **श्री पद्मनाभतीर्थ स्वामी**



Samsthan Shree Gokarn Partagali Jeevottam Mathadheesh

**Shreemat PADMANABHA Teertha Swamiji**



AGURSAL OU PALACIO DO SUAMY EM PARTAGAL
SRI PARTHAGALI MUTT RENOVATED BY H.H. SHRIMAD ANANDA TIRTHA SHRIPADA VADER SWAMIJI IN THE YEAR 1809